# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### वाठार हिंगे (ता.भोर, जि.पूणे) येथील श्री महालक्ष्मी सहकारी पाणीपुरवठा संस्था यांना वीज देयकात सवलत देण्याबाबत

**(१) ३५८७२ (१२-०१-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाठार हिंगे (ता.भोर, जि.पूणे) येथील श्री महालक्ष्मी सहकारी पाणीपुरवठा संस्थेचे सर्व सभासद अल्पभूधारक असून पुनर्वसित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्थेस महावितरण कंपनीने माहे जून २०२१ चे वीज देयक प्रति युनिट तीन रुपये ६९ पैसे आकारले असून महावितरणने या संस्थेस माहे जून २०१९ पूर्वी प्रति युनिट एक रुपये १६ पैसे विज देयक आकारणी केली , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास , शासनाने सन २०२१ पासून सुरू केले विज देयक जास्त असल्याने अल्पभूधारक शेतकऱ्यांना वीज देयकात सवलत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२३) :** (१) मौजे वाठार हिंगे ता. भोर, जि. पुणे हे गाव वीर धरणाचे पाणीपात्रामुळे बाधित पुनर्वसित आहे. येथील श्री महालक्ष्मी सहकारी पाणीपुरवठा सेवा संस्था हा उच्चदाब शेतीपंप विद्युत पुरवठा ग्राहक आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) शासन निर्णय ऊर्जा विभाग दि. ३१.०१.२०१९ व दि. २५.०८.२०२२ अन्वये उच्चदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकांनी भरावयाचा दर रु. १.१६ प्रति युनिट व स्थिर आकारामध्ये रु. १.१६ प्रति युनिट व स्थिर आकारामध्ये रु. २५ प्रति केव्हीए इतकी सवलत पुर्वलक्षी प्रभावाने माहे जून २०२१ पासून देण्यात येत असून सदर योजना शासन निर्णय दि. २२.०८.२०२३ नुसार दि. ३१.०३.२०२४ रोजी पर्यंत वाढविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खामगाव नगरपरिषद येथील तत्कालीन नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांनी पदाचा दुरुपयोग करुन केलेला गैरव्यवहार

**(२) ४४५५२ (०६-१०-२०२२). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा) नगरपरिषद येथील तत्कालीन नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांनी पदाचा दुरुपयोग करून नगर परिषद (१) खामगावचे आर्थिक नुकसान केल्याबाबत एम-केस नं.०१/२०११ अन्वये विविध कलमांन्वये दिनांक २५ फेब्रुवारी, २०११ रोजी वा त्यासुमारास गुन्हे दाखल करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्ह्याचा तपास अंदाजे दोन वर्ष सहा महिन्यांनी तत्कालीन पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांचे दिनांक १३ डिसेंबर, २०१३ रोजीच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखा यांच्याकडे देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन मुख्याधिकारी निलेश देशमुख यांच्याविरोधात विद्यमान न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची परवानगी मिळण्याबाबत आयुक्त तथा संचालक नगरपालिका प्रशासन व प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे किती वेळा पत्रव्यवहार केला व परवानी देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर परवानगी मिळाल्यास अंदाजे अकरा वर्ष गुन्ह्यातील आरोपींना तपास न करता, कारवाई न करता, अटक न करता, पोलिस तपासामध्ये दिनांक २५ फेब्रुवारी, २०११ पासून ते आजपर्यंत दिरंगाई केल्याच्या संबंधित आरोपींना पाठीशी घालणाऱ्यांची चौकशी केली आहे काय, तसेच तत्कालीन मुख्याधिकारी खामगाव नगरपरिषद व इतर आरोपी यांना पोलिस प्रशासनाकडून अभय देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणातील सर्व आरोपींना नियमाप्रमाणे पोलिसांच्या कलमांन्वये अटक करून चौकशी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०२३) :** (१) व (२) होय.
(३) सदर गुन्ह्यातील आरोपीतांविरूध्द विशेष न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी पोलीस घटकाकडून ३०.०४.२०१४ ते १८.१२.२०१७ या कालावधीमध्ये आयुक्त तथा संचालक नगरपालिका प्रशासन व प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे एकूण बावीस (२२) वेळा पत्रव्यवहार करण्यात आला आहे. प्रस्तुत गुन्ह्यातील आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९७ प्रमाणे दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी नगर विकास विभागाकडून दि. १६.०५.२०१६ व ०४.०१.२०१८ रोजीच्या पत्रान्वये परवानगी देण्यात आली आहे.
(४) व (५) नाही. सदर गुन्ह्याचा तपास पुर्ण होऊन गुन्ह्यातील आरोपींविरुद्ध प्रथमश्रेणी न्यायालय-०१, खामगांव, जि. बुलढाणा येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सद्यस्थितीमध्ये सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील कारागृहांवर विविध गुन्ह्यात बंदी असलेल्या आरोपींच्या सुटकेसाठी बोगस जामीनदार दिल्याबाबत

**(३) ४४७२५ (३१-१०-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कारागृहांवर विविध गुन्ह्यात बंदी असलेल्या आरोपींच्या सुटकेसाठी बनावट जामीनदार दिल्याची किती प्रकरणे गुन्हे शाखा आणि वेगवेगळया पोलीस ठाण्याने निदर्शनास आणली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बनावट जामीनदारांविरुध्द व जामीनदार देणाऱ्या आरोपींविरुध्द कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१२-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. अशा प्रकारचे एकूण २५ गुन्हे राज्यातील विविध पोलीस ठाण्यात दाखल असून प्रकरणी ६९ आरोपी निष्पन्न असून त्यापैकी ३० आरोपींना अटक केली असून गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यात महिला, पुरुष व बालकेही बेपत्ता होत असल्याबाबत**

**(४) ४६५०७ (०१-११-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात महिला व पुरुष बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढत असतानाच ० ते १२ वर्षाच्या आतील बालकेही बेपत्ता होत असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भौगोलिक क्षेत्रफळाने मोठा असलेल्या बुलढाणा जिल्ह्यात नागरिकांच्या सुरक्षेसाठी ३३ पोलिस स्टेशनची निर्मिती करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिवसात उक्त गुन्ह्यांमध्ये वाढ झाल्याने पोलिसांवर कामांची अतिरिक्त जबाबदारी वाढली असल्याने यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-१२-२०२३) :** (१) होय. २०२२ मध्ये माहे जून अखेर पर्यंत ० ते १२ वयोगटातील ३४ मुले व ३१ मुली असे एकूण ६५ बालक बेपत्ता झालेले असून त्यापैकी २८ मुले व २५ मुली मिळून आल्या आहेत. उर्वरित बालकांचा शोध सुरु आहे.

(२) होय. बुलढाणा जिल्ह्यात एकूण ३३ पोलीस ठाणी कार्यान्वीत आहेत.

(३) बुलढ़ाणा जिल्हयात बेपत्ता मुले व मुलींचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र 'अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष' स्थापन करण्यात आलेला आहे. तसेच हरविलेल्या बालकांचा शोध घेण्यासाठी ऑपरेशन मुस्कान - ०१ व ०२ यशस्वीरीत्या राबवून हरविलेल्या मुलांचा शोध घेवून त्यांच्या कायदेशीर पालकांच्या स्वाधीन करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील एक युवक "लष्कर से तोयबा" या दहशतवादी संघटनेच्या संपर्कात असल्याबाबत**

**(५) ४६५२४ (३१-१०-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील एक युवक 'लष्कर ये तोयबा' या दहशतवादी संघटनेशी संबंध ठेवून असल्याच्या संशयावरुन दहशतवादविरोधी पथकाने युवकास पुण्यात अटक केल्याचे दिनांक २२ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय निष्पन्न झाले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०२३) :**(१) होय.

(२) या प्रकरणामध्ये दहशतवाद विरोधी पथकाने एकूण ४ आरोपींना पकडले आहेत. या आरोपींविरुध्द सबळ व पुरेसा पुरावा उपलब्ध झाल्याने दि.२०.८.२०२२ रोजी भारतीय दंड विधान कलम १२१(अ), १५३(अ), ११६, २०१ सह माहिती तंत्रज्ञान कायदा- २००८ चे कलम ६६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून एनआयए ॲक्ट अन्वये स्थापीत मा. विशेष न्यायालय, तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश क्र.८, शिवाजीनगर न्यायालय, पुणे यांच्याकडे दोषारोप दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी व ठेकेदार यांनी लाखो रुपये घेऊन मनुष्यबळाची भरती केल्याबाबत**

**(६) ४६८३० (१०-११-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी व ठेकेदार लाखो रुपये घेऊन मनुष्यबळ भरती करत असल्याचा आरोप समाज समता कामगार या संघटनेने केला असून उक्त मनुष्यबळ भरतीची चौकशी करुन दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी समाज समता कामगार संघटनेचे कार्यकर्ते श्री.मंगेश लाड यांनी नवी मुंबईच्या पोलीस आयुक्तांकडे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार पोलीस प्रशासनामार्फत कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर कारवाईअंती दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०२३) :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरण नवी मुंबई महानगर पालिकेशी संबंधीत असल्याने सदर पालिकेच्या अहवालानुसार महापालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये दि. १७.०१.२०२० रोजी पारीत झालेल्या ठरावान्वये एकूण ९६ गटात २६४ क्षेत्रांसाठी गट निहाय बीट मंजूर करण्यात आले आहेत. सदर मान्यतेनुसार महापालिकेने कार्यादेश निर्गमित केल्यावर संबंधीत कंत्राटदाराने बीट मधील रस्ते, पदपथ व दैंनदिन गटारे यांची सफाई करण्यासाठी त्यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी सफाई कामगार लावले आहेत. त्यामुळे सदर कंत्राटदाराने कंत्राटी कामगार लावणे अथवा काढणे ही बाब कंत्राटदाराचे दायित्व असून त्यामध्ये महापालिका हस्तक्षेप करत नाही. यामध्ये महापालिकेच्या कोणत्याही अधिका-याचा हस्तक्षेप नसल्याने समाज समता कामगार संघ यांनी केलेल्या आरोपात तथ्य नाही असे सकृत दर्शनी दिसून आले असल्याचे महापालिकेने अहवालात नमूद केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडा (जि.पालघर) येथील पोलीस ठाणे या भागात जुन्या निवासस्थानाचा पुनर्विकास करण्याबाबत**

**(७) ४७९५२ (३०-१०-२०२२). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) येथील पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना हाऊसिंग सोसायटीच्या माध्यमातून शासकीय निवासस्थाने देण्याबाबतची मागणी तत्कालीन मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, तत्कालीन सार्वजनिक बांधकाम मंत्री, गृह मंत्री तसेच संबंधित विभागाचे अपर मुख्य सचिव व प्रधान सचिव यांच्याकडे दिनांक २६ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्थानिक पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या मंजूरीच्या अनुषंगाने पोलीस निवासी घरांसाठी शासनाने जागा उपलब्ध करुन दिली आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०२३) :** (१), (२), (३) व (४) अपर मुख्य सचिव व प्रधान सचिव यांचेकडे दि. २६/०५/२०२२ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे पोलीस कर्मचाऱ्यांना हाऊसिंग सोसायटीच्या माध्यमातून शासकीय निवासस्थाने देण्याबाबतची मागणी केल्याचे अभिलेखाप्रमाणे आढळुन आलेले नाही. कार्याध्यक्ष श्री. संतोष पाटील पुरस्कृत "समर्थन" या संस्थेचे दि. २६/५/२०२२ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना पालघर येथील वाडा पोलीस

ठाणे लगत असलेल्या जागेवर हाऊसिंग सोसायटीच्या माध्यमातुन पोलीस कर्मचाऱ्यांना निवासस्थाने बांधुन देणेबाबत विषय असलेले लेखी निवेदन सादर केलेले आहे.
पोलीस हाऊसिंग सोसायटीच्या माध्यमातुन पोलीस कर्मचाऱ्यांसाठी निवासी संकुल बांधकाम करणेसाठी सुयोग्य अशा जागांचा शोध चालु आहे. जागा उपलब्ध होताच पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याची पोलीस अधीक्षक, पालघर यांनी तजविज ठेवलेली आहे. तसेच पोलीस अधीक्षक, पालघर यांचेकडील संदर्भान्वये वाडा पोलीस ठाणेकरीता ०७ अधिकारी निवासस्थाने व ८० पोलीस अंमलदार निवासस्थाने इमारती बांधकाम करणेबाबत पुन्हा नव्याने प्रस्ताव व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ मुंबई यांना परस्पर सादर करण्यात आला आहे. पोलीस हाऊसिंग सोसायटीच्या माध्यमातून पोलीस अंमलदारांसाठी निवासी संकुल बांधकाम करण्याच्या दृष्टीने प्रशस्त जागा विकासक तसेच विविध परवाने लागण्याची शक्यता लक्षात घेता सदरचे प्रकल्पासाठी काही अवधी लागणार आहे.

---

**राज्य पोलिसांच्या गस्ती नौकांच्या देखभालीच्या नावाखाली निधीचा झालेला गैरव्यवहार**

**(८) ४८०३१ (३०-१०-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य पोलिसांच्या गस्ती नौकांच्या देखभालीच्या नावाखाली सव्वासात कोटी रुपयांच्या निधीचा गैरव्यवहार झाल्याबाबत मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखा विभागाकडून तपास करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू नौकांचे जुने इंजिन बदलून निर्मात्याकडून घेतलेले नविन इंजिन नौकांमध्ये बसविण्याऐवजी परदेशातून खरेदी केलेली जुनी इंजिने या नौकांमध्ये बसविण्यात येवून प्रत्यक्षात नविन इंजिन बसविल्याच्या पावत्या सादर करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी तीन नौकानिर्मिती कंपन्यांमधील अधिकाऱ्यांविरोधात शिवडी पोलीस स्थानकात माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू तीन कंपन्यांची व ज्या अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच त्यांची नावे, किती कालावधी व इतर तपशील काय आहे, त्यानुसार तपासाची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, तपासानुसार त्यात काय आढळून आले,
(५) असल्यास, यासंदर्भात आर्थिक गुन्हे शाखेकडून दोषींविरुध्द कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) होय, हे खरे आहे,
(३) होय, हे खरे आहे,
(४) व (५) महाराष्ट्र राज्य सागरी सुरक्षा गस्ती करीता दिलेल्या नौकांच्या देखभाली व दुरुस्तीच्या नावाखाली झालेल्या गैरव्यवहाराबाबत ॲक्वारियस शिपयार्ड प्रा. लि. (ए.एस.पी.एल), गोवा शिपयार्ड प्रा. लि. आणि ब्रिलियंट सीगल प्रा. लि. (बी.एस.पी.एल) या ३ खाजगी कंपनी मधील जबाबदार अधिकारी व कर्मचारी तसेच, नौका विभाग, मोटार परिवहन विभाग आणि महाराष्ट्र पोलीस मधील जबाबदार शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या विरोधात शिवडी पोलीस ठाणे, मुंबई गु.र.नं. २८६/२२ कलम १७७, १९७, ४०६, ४०९, ४२०, ३४ भा.द.वि (CCTNS FIR ३६०/२२) येथे दि. २१.०५.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### दौंड (जि.पुणे) येथे कुरकुंभ औद्योगिक क्षेत्रात केमिकलच्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबत

**(९) ४८५९२ (३०-१०-२०२२). अॅड.राहूल कुल (दौंड), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) येथे कुरकुंभ औद्योगिक क्षेत्रात केमिकलच्या चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याबाबतचा प्रकार माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत तीन ते चार वर्षांनी दौंड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये देखील मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबतच्या तक्रारी स्थानिक नागरिकांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त केमिकलच्या चोरीच्या एकूण किती घटना झाल्या व किती गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे, तसेच चोरीच्या घटना घडू नयेत म्हणून शासनाने कोणत्या उपाययोजना वा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :**(१) व (२) हे खरे नाही. मात्र मौजे कुरकुंभ एम.आय.डि.सी., दौंड (जि. पुणे) येथील एका कंपनीच्या गोडाऊनमधून दि. २४.१२.२०२० ते दि. ०६.०१.२०२२ या कालावधीमध्ये 'रोडियम ऑन ॲल्युमिना' हे केमिकल चोरीला गेल्याचे दिनांक ०६.०१.२०२२ रोजी लक्षात आल्याने दिनांक १६.०३.२०२२ रोजी प्राप्त फिर्यादीनुसार पोलीस ठाणे, दौंड येथे केमिकल चोरीच्या अनुषंगाने गु.र.क्र. १४१/२०२३, भा.दं.वि. कलम ३८०, १२० ब, ४२०, ३८१, २०१, ४११, ३४ अन्वये केवळ एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात एकूण ८ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचे दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले आहे.

प्रकरणी स्थानिक नागरिकांनी तक्रारी दाखल केलेल्या नाहीत.

(३) वर नमूद करण्यात आल्याप्रमाणे केवळ १ गुन्हा दाखल असून त्यामध्ये ८ आरोपींना अटक करण्यात आले आहे.

चोरीच्या घटना भविष्यात घडू नयेत याकरिता संबंधीत पोलीस घटकाकडून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-

१. केमिकल कंपनीच्या सर्व कंपनी एच. आर. यांची बैठक घेऊन त्यांना सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बसविण्याबाबत व सुरक्षा रक्षक नेमण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

२. कंपन्यांच्या आतील व बाहेरील बाजूस पोलीस पेट्रोलिंग नेमण्यात आल्या आहेत.

३. कुरकुंभ पोलीस मदत केंद्रामधील सर्व अंमलदारांचे मोबाईल नंबर कंपनीतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात आलेले असून रात्रगस्तीसाठी कुरकुंभ क्षेत्रात नियंत्रण कक्षाच्या देखरेखीखाली चालवली जाणारी व्हॅन ( ADM Van) नेमण्यात येत आहे.

४. Emergency Response Support System हे डिव्हाईस (डायल ११२) कुरकुंभ पोलीस मदत केंद्रासाठी देण्यात आले आहे.

५. रात्रपाळीचे अधिकारी व अंमलदार यांना नाईट राऊंडच्या गस्तीदरम्यान औद्योगिक क्षेत्रात भेटी देण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खांदेश्वर (ता.पनवेल, जि.रायगड) येथील पोलस चौकी अरूंद जागेत सुरू असल्याबाबत

**(१०) ४९४७१ (१७-०१-२०२३). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खांदेश्वर (ता.पनवेल, जि.रायगड) येथील पोलस चौकी अरूंद जागेत सुरू असल्यामुळे कर्मचारी, अधिकारी व नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको प्रशासनाने पोलीस ठाण्यासाठी नवीन पनवेल येथे भूखंड देवूनही जवळपास ९ वर्षे होवूनसुद्धा अद्यापही पोलीस ठाण्याच्या इमारतीचे काम गृह विभागाकडून निधी उपलब्ध न झाल्यामुळे प्रलबिंत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून खांदेश्वर पोलीस ठाण्याची नवीन पनवेल येथील भूखंडावर इमारती उभारण्यासाठी तातडीने निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०२३) :**(१), (२), व (३) होय.
दिनांक २३.०३.२०१३ रोजी खांदेश्वर पोलीस ठाण्याची नवीन निर्मिती झालेली आहे. तेव्हापासून खांदेश्वर पोलीस ठाणे प्लॉट क्र.१, सेक्टर ८, खांदा कॉलनी या ठिकाणी पुर्वी असलेल्या खांदा कॉलनी चौकीच्या इमारतीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात चाली करण्यात आले होते. त्यामुळे सदरची जागा ही अरुंद असल्यामुळे कर्मचारी, अधिकारी व नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.
सिडको विभागाकडून दिनांक ०३.०४.२०१४ रोजी नवीन पनवेल सेक्टर नंबर ५ ए. प्लॉट क्र. १ येथील ७८२० चौरस मीटर भूखंड आरक्षित ठेवलेला होता. त्यामधुन सिडको विभाग, नवी मुंबई यांनी दि. २५.११.२०१४ च्या पत्रान्वये खांदेश्वर पोलीस ठाणे यांना हा १९९९.३४ चौ.मी. क्षेत्रफळाचा भुखंड क्र. १ अ, सेक्टर नं. ५ ओ, नवीन पनवेल येथे वाटप केलेला आहे. दिनांक १५.०१.२०१५ रोजीचे भाडेपटटा करारनाम्यान्वये खांदेश्वर पोलीस ठाण्याकरिता नवी मुंबई पोलीस प्रशासनास वितरीत केलेला आहे. दिनांक २७.०७.२०१६ रोजी सदर भुखंडाच्या इसा-याची रक्कम रु.५२,४४,०००/- इतकी सिडकोच्या खात्यावर वळती करण्यात आलेली आहे. परंतु बांधकाम अदयाप सुरु करण्यात आलेले नाही. दिनांक १०/०२/२०१७ अन्वये शासनास सदर भुखंडाच्या संपादन करणेकरीता इसा-याची उर्वरित वाढीव रक्कम रु.२०,३०,५१५/- भरणा करणेकरिता कार्यवाही सुरू आहे. तसेच पोलीस आयुक्त, नवी मुंबई या कार्यालयाकडून दि.१४.०२.२०२३ च्या पत्रान्वये सिडको प्रशासनास सन २०१४ ते आजपावेतो इसा-याची रक्कम कळविण्याबाबत विचारणा केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई गोरेगांव (पूर्व), ऑबेरॉय मॉल समोरील शाम वाडी, न.भू.क्र.१०८ मौजे दिंडोशी येथे पोलीस उपायुक्त परिमंडळ-१२ आणि दिंडोशी पोलीस ठाणे उभारण्याबाबत

**(११) ४९४८१ (१७-०१-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई गोरेगांव पूर्व, ऑबेरॉय मॉल समोरील शाम वाडी, न.भू.क्र.१०८, मौजे दिंडोशी येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या २०३४च्या विकास आराखड्यानुसार न्यायालय व शासकीय गृहनिर्माणाकरिता आरक्षित असलेल्या भूखंडापैकी ४१०१.१० चौ.मी. क्षेत्राचा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना सात वर्षाकरिता दिलेल्या भूखंडाची मुदत संपुष्टात आल्यानंतर सदरहू भूखंड पोलीस उपायुक्त परिमंडळ-१२ आणि दिंडोशी पोलीस ठाणे करिता उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन राज्य शासनाने दि.२४ ऑगस्ट २०२२ रोजीच्या वा त्या त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त न.भू.क्र.१०८ मौजे दिंडोशी, ता.बोरिवली येथील भूखंडावरील मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला दिलेला भूखंड ताब्यात घेऊन संपूर्ण भूखंड गृह विभागास हस्तांतरीत करुन त्यावर परिमंडळ कार्यालय तथा पोलीस ठाणे उभारण्याच्या दृष्टीने अद्याप शासनातर्फे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०२३) :** (१), व (२) होय.
दिंडोशी पोलीस ठाणेच्या व पोलीस उप आयुक्त, -परिमंडळ-१२ कार्यालयाच्या बांधकामाकरिता भूखंड उपलब्ध करून देणेबाबत दि.१६/०३/२०२२ रोजी मा. सभापती, विधानपरिषद यांचे समिती कक्षात बैठक झाली. त्यामध्ये गोरेगांव

(पूर्व), मुंबई येथील ओबेरॉय मॉल समोर शामवाडी न.भू.क्र. १०८, मौजे दिंडोशी ता. बोरीवली हा भुखंड मुंबई आणि मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांचे प्रयोजन संपल्यानंतर पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१२ यांचे कार्यालय आणि दिडोंशी पोलीस ठाणे करीता उपलब्ध करून देणेबाबतची कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले.

न.भू.क्र. १०८, फिल्म सिटी रोड, मालाड (पूर्व), मुंबई येथील महाराष्ट्र शासनाच्या ४११७.६ चौ.मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावरील " मनोरंजनाचे मैदान" हे आरक्षण वगळून भूखंड, पोलीस विभागासाठी आरक्षित ठेवणेबाबत सदर भूखंड आरक्षित करण्याकरिता नगर दिवाणी व सत्र न्यायालय, बोरीवली सत्र विभाग दिंडोशी यांच्याकडून मागणी होत आहे व मागणीनुसार विषयांकित भूखंडावरील न्यायालय व शासकीय गृहनिर्माणाचे आरक्षण बदलून पोलीस विभागाकरिता आरक्षित करणेसाठी, विकास आराखडा २०३४ मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार फेरबदल करावे लागतील, जे नगरविकास विभागाच्या अखत्यारीत येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालयाकडून पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना कळविले आहे.

सदर भूखंड पोलीस विभागाकरिता आरक्षित करणेसाठी विकास आराखडा २०३४ मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार फेरबदल करून न्यायालय व शासकीय गृहनिर्माणाचे आरक्षण बदलून पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - १२ आणि दिंडोशी पोलीस ठाणेकरिता उक्त भूखंड पोलीस विभागास उपलब्ध करून देणेबाबत दि. ०२/०९/२०२२ च्या पत्रान्वये पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी नगर विकास विभागास कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चांदुर रेल्वे शहरातील गारडीपूरा येथून अल्पवयीन मुलीला चाकुचा धाक दाखवून अपहरण केल्याबाबत**

**(१२) ५०९३७ (१७-०१-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील चांदुर रेल्वे शहरातील गारडीपूरा येथून अल्पवयीन मुलीला चाकुच्या धाकावर पळवून नेणाऱ्या अट्टल गुन्हेगार नईम खान रहमान खान वय ३५ राहणार चांदूर रेल्वे याचा दिंनाक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी रात्री १.३० च्या सुमारास खुन करण्यात आल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०२२ च्या सुमारास निर्दशनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चांदूर रेल्वे शहरातून २१ सप्टेंबर, २०२२ रोजी दुपारी ३.३० च्या सुमारास एका मुलीचे अपहरण करण्यात आल्याची माहिती पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या शेकडोच्या जमावाने देऊन सुध्दा या गंभीर प्रकरणाकडे पोलीसांनी दुर्लक्ष केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गंभीर प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व चौकशी अंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०२३) :** (१) होय,
(२) हे खरे नाही, सदर गुन्हा घडल्यानंतर त्याच दिवशी नाकाबंदी करून पिडीत व आरोपीचा पोलीस विभागाकडून शोध सुरू असतानाच दि. २३.०९.२०२२ रोजी आरोपीने पिडीतेस पहाटे ०३.०० वा. तिच्या घरी सोडले होते.
(३) प्रस्तुत प्रकरणाबाबत पोलीस ठाणे, चांदूर रेल्वे येथे अप. क्र. ४९८/२०२२, भा.दं.वि. कलम ३६३, ४५२, ५०४, ५०६, ३४, ३५४, आर्म्स ॲक्ट कलम ३/२५ तसेच पोक्सो कायदा कलम ८ प्रमाणे गुन्हा दाखल करून अपहृत मुलीची ३६ तासांच्या आत सुटका करण्यात आली. तसेच, अपहरणकर्त्याच्या खुनाप्रकरणी ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणी विशेष अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती येथे दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईसह महाराष्ट्रामध्ये अपहरणाच्या घटनांसह बाल गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असणे**

**(१३) ५०९८६ (०९-०३-२०२३). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या अहवालानुसार मोठया प्रमाणात महिला व मुलींचे मोठया प्रमाणात अपहरण होत असून मुंबई २०२१ मध्ये अपहरणाच्या १७९० घटना घडल्या असुन त्यात महिला व मुलींचे प्रमाण जास्त आहे २०२० तुलनेत त्यामध्ये ८.६ टक्के वाढ झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) मुंबईसह महाराष्ट्रामध्ये अपहरणाच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालकांवरील लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पोस्को) २०२१ अखेर पर्यंत ९३ टक्के गुन्हे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महिला आणि मुलांवरील वाढत्या अत्याचारांच्या गुन्हेगारीला आळा बसावा तसेच प्रलंबित गुन्हे निकाली काढण्यासाठी शासनाने कोणती ठोस निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०२३) :**(१) राष्ट्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या अहवालानुसार बृहन्मुंबई क्षेत्रातील सन २०२१ मध्ये १५९० अपहरणांच्या गुन्ह्यांची नोंद आहे.

(२) NCRB च्या अहवालानुसार मुंबईसह महाराष्ट्रातील Kidnapping & Abduction सांख्यिकी माहिती पुढीलप्रमाणे .

| अ.क्र. | सन | अपहरणाचे गुन्हे |
|---|---|---|
| १. | २०१९ | ११७५५ |
| २. | २०२० | ८१०३ |
| ३. | २०२१ | १०५०२ |

(३) बृहन्मुंबई शहरातील बालकांवरील लैगिंक अत्याचार कायद्यांतर्गत (पोस्को) २०२१ अखेर पर्यंत ७२% गुन्हे प्रलंबित आहेत.

(४) बालकांवरील अत्याचार रोखण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये विशेष पोलीस दल स्थापन करण्यात आले आहे. महिला व बालकांवरील अत्याचारांची प्रकरणे निकाली काढण्याकरिता राज्यात विशेष न्यायालये व जलदगती न्यायालये स्थापन केले आहेत. तसेच सर्व ४९ पोलीस घटकामध्ये विशेष बाल पोलीस पथके कार्यरत आहेत. हरविलेल्या बालकांचा शोध घेण्यासाठी राज्यात ऑपरेशन मुस्कान राबविण्यात येत आहे. अल्पवयीन मुलीवर होणारा अत्याचार रोखण्याकरिता पोलीस घटकामध्ये पोलीस काका, पोलीस दिदी, निर्भया पथक, दामिनी पथक, भरोसा सेल कार्यरत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर-५ येथील गायकवाड पाडा येथे नवीन सबस्टेशनच्या कामाबाबत**

**(१४) ५३१५३ (२०-०१-२०२३). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गायकवाड पाडा,उल्हासनगर-५ येथे नवीन सबस्टेशन मंजूर करण्यात असून त्याचा कामासंदर्भात निविदा मागवूनही कामास अद्यापही सुरुवात झालेली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गायकवाड पाडा येथील सबस्टेशनचे काम जलदगतीने मार्गी लावण्यात यावे अन्यथा जनआंदोलन करण्यात येईल असे लेखी निवेदन स्थानिक नागरीकांसह लोकप्रतिनिधींनी उर्जामंत्री यांना दि.१८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने गायकवाड पाडा येथे नवीन सबस्टेशनच्या काम तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

सदर निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) सद्यस्थितीत महापारेषण व महावितरण कंपनी दरम्यान जमिनीच्या हस्तांतरणाची प्रक्रिया सुरु आहे.

जमिन ताब्यात आल्यावर व मा. विद्युत नियामक आयोगाची तत्वत: मान्यता प्राप्त झाल्यावर महापारेषण कंपनीतर्फे नियमानुसार निविदा प्रक्रिया व्दारे L-१ कंत्राटदारास उपकेंद्र व वाहिनी उभारणीसाठीचे कार्यादेश देण्यात येणार आहेत.

(४)प्रश्न उद्भवत नाही.

---

**हडपसर, पुणे येथे कार्यरत असलेले एसआरपी (ग्रुप २) जवान बेपत्ता असल्याबाबत**

**(१५) ५३६५९ (१८-०१-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महंमदवाडी पोलीस स्टेशन, हडपसर, पुणे येथे कार्यरत एसआरपी (ग्रुप २) जवान किशोर वाघमारे दिनांक २९ ऑक्टोबर २०२० रोजी वा त्यासुमारास कामावर जातो असे सांगून बेपत्ता झाल्याने त्यांचा अद्याप तपास लागत नसल्याप्रकरणी तसेच शोध घेतला जावा याकरिता मा.उपमुख्यमंत्री (गृह) तसेच वानवडी पोलीस स्टेशन, महंमदवाडी पोलीस स्टेशन, हडपसर, पुणे येथे बेपत्ता कर्मचारी यांच्या पत्नीने माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जवान महंमदवाडी पोलीस स्टेशन अंतर्गत महंमदवाडी पोलीस चौकीत कार्यरत असताना बेपत्ता झाला व त्याची तक्रार वानवडी पोलीस (पुणे) पाठवण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेपत्ता एसआरपी जवान याचा शोध घेण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-१२-२०२३) :** (१) राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक २, रामटेकडी, पुणे येथे कार्यरत असलेले जवान श्री. किशोर वाघमारे हे दिनांक २९.१०.२०२० पासून बेपत्ता असल्याबाबत त्यांच्या भावाने दिनांक ३० ऑक्टोबर २०२० रोजी वानवडी पोलीस स्टेशन, पुणे अंतर्गत महंमदवाडी पोलीस चौकी येथे फिर्याद दिली होती.
सदर तक्रारीचा पाठपुरावा करण्याकरिता त्याचा भाऊ महमंदवाडी पोलीस स्टेशन येथे आला असता त्याचेकडून अधिक माहिती प्राप्त करून त्याचा दि. १३.१२.२०२१ रोजी जबाब नोंदविण्यात आला होता.
(२) श्री. वाघमारे हा महंमदवाडी पोलीस चौकी कार्यक्षेत्रात वास्तव्यास होता. तो राहत्या घरातून बेपत्ता झाल्याने त्याची वानवडी पोलीस ठाणेस मनुष्य मिसींग नंबर ७२/२०२२ अन्वये मिसींग नोंद करण्यात आली आहे.
(३) सदर जवानाचा शोध घेण्यासाठी पोलीस नियंत्रण कक्ष, पुणे शहर यांच्यामार्फत सर्व पोलीस ठाण्यांमध्ये त्याबाबत ब्रॉडकास्ट करण्यात आले असून पुणे शहरातील सर्व पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना तपास याद्या पाठविण्यात आलेल्या आहेत. तसेच, बेपत्ता व्यक्तीच्या बँक खात्याची माहिती घेण्यात येणे, वानवडी पोलीस ठाण्याअंतर्गत सर्व पोलीस चौक्या व तपास पथक प्रभारी अधिकारी यांना बेपत्ता व्यक्तीचा तपास होण्यासाठी विनंती पत्र देणे, केबल नेटवर्क, फातीमानगर, पुणे यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
१. वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध होण्यासाठी जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचेशी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.
२. अपर पोलीस महासंचालक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पाषाण, पुणे यांना राजपत्रात प्रसिद्ध होण्याबाबत अहवाल देण्यात आला आहे.
३. व्यवस्थापक, दुरदर्शन वरळी केंद्र मुंबई यांना प्रसारण होणेबाबत अहवाल देण्यात आला आहे.
४. मोबाईल सी.डी.आर व एस.डी.आर तपासला असता मोबाईल बंद असल्याचे आढळून आला आहे.
५. बेपत्ता व्यक्तीच्या डीमॅट खात्याची माहिती तपासली असता सदर व्यक्तीचे खाते बंद असल्याचे आढळून आले आहे.
६. कात्रज भागातील लॉज चालकांकडे तपास करुन मॅनेजरचे टिपण तयार करण्यात आलेले आहे.
७. बेपत्ता व्यक्ती एका मुलीसोबत पळून गेल्याची शंका असल्याने सदर मुलीच्या घरच्यांकडे तपास केला असता त्यांनी सदर मुलगी बेपत्ता झाल्याबाबत हडपसर पोलीस ठाणे येथे मनुष्य मिसिंग क्र. २९०/२०२०, दि. ३०/१०/२०२० अन्वये मिसिंग तक्रार दाखल केलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे न-हे व मौजे निगुडघर(ता.भोर, जि.पुणे) येथे वीज प्रवाहामुळे मृत पावलेल्या इसमाच्या वारसास व मृत पावलेल्या जनावरांच्या मालकास आर्थिक मदत मिळण्याबाबत

**(१६) ५३९५७ (२०-०१-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे न-हे व निगुडघर (ता.भोर, जि.पुणे) येथे वीज प्रवाहामुळे मृत पावलेल्या इसमाच्या वारसास व मृत पावलेल्या जनावरांच्या मालकास आर्थिक मदत मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी अधिक्षक अभियंता, विज वितरण कं. लि.बारामती परिमंडळ, (ता. बारामती, जि.पुणे) यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनावर निर्णय घेवून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) प्राणांतिक अपघात झालेल्या श्रीमती सुभद्रा सोनबा वरे, रा. वरावडी, ता. भोर, जि. पुणे यांच्या वारसास महावितरण

कंपनीच्या नियमानुसार आर्थिक नुकसान भरपाई रक्कम रु. ४,००,०००/- अदा करण्यात आली आहे. तसेच मौजे नऱ्हे व मौजे निगुडघर ता. भोर, येथे प्राणांतिक अपघात झालेल्या गाय व म्हैस यांच्या मालकास महावितरण कंपनीच्या नियमानुसार प्रत्येकी ३०,०००/- रुपये नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बनावट व खोट्या माहितीच्या आधारे सन २०१९-२०२० मध्ये नि:शस्त्र सहाय्यक पोलीस निरीक्षक यांना देण्यात आलेल्या पदोन्नतीबाबत

**(१७) ५४९९३ (२७-०१-२०२३). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या पोलिस महासंचालकांनी नि:शस्त्र पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यासाठी नि:शस्त्र सहाय्यक पोलीस निरीक्षकांची सन २०१९-२० ची निवड सूची तयार करण्याकरिता पदोन्नतीच्या विचार कक्षेतील नि:शस्त्र सहाय्यक पोलीस निरीक्षकांची माहिती विहित प्रपत्रांमध्ये मागविली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंगोली जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील श्री. ओमकांत चिंचोळकर, नि:शस्त्र सहाय्यक पोलीस निरीक्षक यांचे नाव पोलीस अधीक्षक, हिंगोली यांनी दिनांक ०३ जुलै,२०२० च्या पत्रान्वये विहित प्रपत्रासह पाठविले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रपत्र-१ व अन्य विहित प्रपत्रांमधील माहिती खातरजमा न करता बनावट व खोटी माहिती तत्कालीन जिल्हा पोलीस अधीक्षक, हिंगोली यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर, वाहतूक शाखा, हिंगोली यांचेशी संगनमताने राज्याच्या पोलिस महासंचालकांना पाठवून पदोन्नती प्राप्त केल्याची तक्रार शासनाकडे प्राप्त होऊन देखील आजपर्यंत थातूरमातूर अभिप्राय मागविण्यापलीकडे शासनाने कुठलीही कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, खोट्या माहिती पुरवून नि:शस्त्र पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती मिळविणारे ओमकांत चिंचोळकर आणि प्रपत्र-१ द्वारे खोटी बनावट व दिशाभूल करणारी माहिती वरिष्ठांना सादर करणारे तत्कालीन जिल्हा पोलीस अधीक्षक, हिंगोली आणि तक्रार प्राप्त होऊनही कारवाई न करणारे पोलीस महासंचालक यांचे विरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-११-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) सन २०१९-२० निवडसूचीवर पदोन्नतीसाठी विचार करण्यासाठी पोलीस महासंचालक, मुंबई कार्यालयाकडून दि.१७.०३.२०२० अन्वये माहिती मागविण्यात आली होती. त्यानुषंगाने पोलीस अधीक्षक, हिंगोली यांनी दि.०३.०७.२०२० रोजीच्या पत्रान्वये पदोन्नती कक्षेतील सहायक पोलीस निरीक्षकांची नावे पाठविण्यात आली होती. त्यामध्ये श्री.चिंचोळकर यांचेही नाव समाविष्ट होते. सदर कालावधीत श्री.चिंचोळकर यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु झालेली नव्हती. तसेच, त्यांना दोषारोप पत्राही बजावण्यात आले नव्हते. त्यामुळे श्री.चिंचोळकर यांच्याविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नसल्यामुळे त्यांना पदोन्नती देय असल्याचे दिसुन येते.
(४) श्री.चिंचोळकर यांचा सन २०१९-२०च्या निवडसूचीवर पदोन्नतीसाठी विचार करण्यात आला, त्यावेळी श्री.चिंचोळकर यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु झालेली नव्हती. तदनंतर श्री.चिंचोळकर यांच्याविरुध्द सुरु करण्यात आलेली विभागीय चौकशी अद्याप सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कन्हाळे शिवार भुसावळ उपकेंद्रात कर्तव्यावर असताना कर्मचाऱ्यांचा मुत्यृ झाल्याबाबत**

**(१८) ५७०७६ (३०-०४-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्हाळे शिवार भुसावळ (इ. अँण्ड एम) उपकेंद्रात कर्तव्यावर असताना श्री. प्रमोद शिवराज चौधरी या वीज वितरण कर्मचाऱ्यांचा वीजेचा धक्का लागून दिनांक ३ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,
(३) असल्यास, त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्याबाबत तसेच कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
कन्हाळे शिवार भुसावळ येथे वीज वितरण कंपनीच्या कोणत्याही कर्मचाऱ्याचा विजेचा धक्का लागून दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झालेला नाही.
(२) दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२२ रोजी श्री. प्रमोद श्रीराम चौधरी, रा. कन्हाळे, जि. जळगाव यांच्या मालकीच्या दोन बैलांचा लघुदाब वाहिनीच्या तुटलेल्या तारांच्या संपर्कात आल्याने विजेचा धक्का लागून प्राणांतिक अपघात झाला. विद्युत निरीक्षक, जळगांव यांनी सदरील घटनेशी चौकशी करुन महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस प्रचलित नुकसान भरपाई देण्याबाबत शिफारस केली. त्यानुसार श्री. प्रमोद श्रीराम चौधरी यांना महावितरण कंपनीच्या नियमानुसार नुकसान भरपाई रक्कम रु. ५२,५००/- धनादेश क्र. ०८८३५४ दिनांक ११.०७.२०२३ अन्वये अदा करण्यात आलेली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लवंगी (ता. मंगळवेढा, जि.सोलापूर ) येथील ग्रामपंचायतीसहित इतर १५ गावांचा समावेश म्हैसाळ योजनेंतर्गत करण्याबाबत**

**(१९) ५७१७५ (२४-०४-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लवंगी (ता. मंगळवेढा, जि.सोलापूर ) येथील ग्रामपंचायतीने दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास कर्नाटक राज्यांमध्ये जाण्याचा ठराव घेतला असल्याची धक्कादायक बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ग्रामपंचायतीने गावात पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी, रस्ते, आरोग्य, स्वच्छता आदी सोयी सुविधा व प्रामुख्याने म्हैसाळ योजनेत सदर गावांचा समावेश करण्याबाबत प्रशासनाकडे वारंवार मागणी करून देखील दखल न घेतल्यामुळे उक्त ठराव घेतला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त लवंगी या सोबतच शिरनंदगी, रेवेवाडी, हुन्नर, मोहमदाबाद(हु) चिकलगी, जंगलगी, बावची, पौट, आसबेवाडी, शिवणगी, येळगी, सोद्दी, पडोळकरवाडी, लोणार, मारोळी सलगर (खू), सलगर(बु) या गावांनी देखील त्यांचा समावेश म्हैसाळ योजनेअंतर्गत करावा अशी मागणी केली आहे, खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले तद्अनुषंगाने उक्त गावांच्या मागणीची त्वरीत दखल घेऊन स्थानिक प्रशासनाला आवश्यक कारवाई करण्यासाठी आदेश शासन देणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) अशी कोणतीही मागणी नाही.
तथापि, सदर गावे कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्पाच्या मंजूर पाचव्या सुधारित प्रशासकीय अहवालात समाविष्ट आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाकण (जि.खेड) येथील घराला लागलेली आग

**(२०) ५७३४८ (३०-०४-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), अॅड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण-रोहकल रस्त्यावर जरे निसर्ग चाकण(जि.खेड) येथील छत्रपती शिवाजी नगरमध्ये दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास रात्रीच्या वेळी घराला आग लागली, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त आग कशामुळे लागली आणि आगीमध्ये झालेल्या हानीचा तपशील काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले त्याअनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.
मौजे जरे निसर्ग, छत्रपती शिवाजी नगर, चाकण, ता. खेड, जि. पुणे येथे श्री. संतोष कचरुबा लांडगे यांच्या घरी दिनांक ११ जानेवारी, २०२३ रोजी रात्री ८.३० च्या सुमारास आग लागली.
(२) विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षण विभाग, पुणे यांच्या अहवालानुसार श्री. संतोष कचरुबा लांडगे यांच्या घरामधील बेडरुम मध्ये आग लागून इतरत्र पसरली होती.
(३) विद्युत निरीक्षक, पुणे व उपकार्यकारी अभियंता, चाकण यांनी दिनांक १०.०२.२०२३ रोजी घटनास्थळी संयुक्त पाहणी करुन जळीत अपघात प्रकरणी महावितरण कार्यालयास चौकशी अहवाल सादर केला आहे. सदर चौकशी अहवालात घटनास्थळी असलेला स्वीचबोर्ड बाहेरील आगीमुळे जळाला असून स्वीचबोर्ड, मधील वायरींग सुस्थितीत होती. तसेच घटनेच्या दिवशी वीज संच मांडणी मधील एम.सी.बी. ट्रीप झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच विद्युत संच मांडणीच्या सुरक्षा यंत्रणेवर विद्युत शॉर्टसर्कीटच्या कोणत्याही खुणा आढळल्या नाहीत. यावरुन सदर ठिकाणी लागलेली आग ही विद्युत कारणाने लागलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इतर मागास प्रवर्गाकरिता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले घरकुल योजना स्वतंत्रपणे राबविण्याबाबत

**(२१) ५७४२३ (२१-०४-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर मागास प्रवर्गाकरिता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले घरकुल योजना स्वतंत्रपणे राबविण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनामार्फत प्रस्ताव तयार करण्यात आला आहे काय, तसेच प्रस्तावास मंजुरी मिळण्यास किती कालावधी लागणार आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (३१-१०-२०२३) :** (१), (२) व (३) प्रधानमंत्री आवास योजनेच्या धर्तीवर राज्यात ग्रामीण भागात वास्तव्यास असणाऱ्या इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील पात्र कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी "मोदी आवास" घरकुल योजना राबविण्यास अनुक्रमे दि.२८.०७.२०२३ व दि.२७.०९.२०२३ रोजीच्या शासन निर्णयांन्वये मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेतंर्गत इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी येत्या तीन वर्षात १० लाख घरे बांधण्यासाठी रुपये १२ हजार कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

तसेच, या योजनेतंर्गत घरकुलास पात्र लाभार्थ्यांकडे घरकुलाच्या बांधकामासाठी स्वत:ची जागा उपलब्ध नसल्यास सदर लाभार्थ्यास क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले योजनेंतर्गत ५०० चौ.फुट पर्यंत जागा खरेदी करण्यासाठी रुपये ५० हजारपर्यंत अनुदान देय करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे व परिसरात कोयता गँग दहशत पसरवत असल्याबाबत**

**(२२) ५८०७३ (३०-०४-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील स्वारगेट, चतुशृंगी, शिवाजी नगर, पुणे स्टेशन व इतर अनेक भागात कोयता गँगने नागरिकांवर हल्ले केले असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस स्टेशनची हद्द पाहता पुरेसे पोलीस अधिकारी व कर्मचारी बळ नसून या पोलीस स्टेशन अंतर्गत खडकवासला मतदारसंघात अनेक गुन्हांची तपासाची गती संथ असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्नी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोयता गँगचा बंदोबस्त करण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास ,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०२३) :** (१) पुणे पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात कोयता गॅंग अस्तित्वात नाही. परंतू, कोयता तसेच धारदार शस्त्राचा वापर करुन काही व्यक्ती दहशत निर्माण करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रकरणी ११९ गुन्हे दाखल करण्यात आले असून ४३० आरोपींना पोलीसांकडून अटक करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही. पुणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्राप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध असून त्याठिकाणी दाखल होणा-या गुन्ह्यांचा तपास पोलीसांकडून योग्य रितीने करण्यात येतो.

(३) सदर प्रकरणी पोलीस विभागाकडून विविध उपाययोजना करण्यात येत असून त्यामध्ये भारतीय हत्यार कायदा कलम ४ (२५) अन्वये सन २०२२ व २०२३ मधील दाखल गुन्ह्यांची यादी तयार करून त्यामधील गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणे, गुन्हेगारांचे पुर्वरेकॉर्ड तपासून गुन्हेगारांवर MCOCA व MPDA कायद्यान्वये कारवाई करणे, सदर प्रकारच्या गुन्हेगारांवर आळा बसविण्यासाठी व त्यांचा शोध घेण्यासाठी ऑल आऊट ऑपरेशन/ कोंबिग ऑपरेशन राबविण्यात येणे, व्हॉट्स ॲप, फेसबुक, इंस्टाग्राम या सारख्या इतर सोशल मिडीया माध्यमांमधून दाखल झालेल्या गुन्ह्यामधील गुन्हेगारांवर कारवाई करण्यात येणे इ. उपाययोजनांचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबाजोगाई शहरासाठी नवीन पोलीस स्टेशन मंजूर करण्याबाबत**

**(२३) ५८८८६ (१४-०६-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई शहराची झपाट्याने वाढ होत आहे. या ठिकाणी नवाजलेल्या शैक्षणिक संस्था असून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय असून ग्रामीण भागातील मोठ्याप्रमाणात विद्यार्थी या ठिकाणी शिक्षणासाठी व रुग्ण

उपचारासाठी येतात. तसेच शहरात प्रसिद्ध योगेश्वरी देवीचे मंदिर असून परिसरात पुरातन मंदिरे व लेण्याआहेत त्यामुळे भाविक भक्त व पर्यटक मोठ्याप्रमाणात शहरात येतात तसेच परिसरातील नागरिक रोजगारासाठी शहरात स्थलांतरीत झाले आहेत. त्यामुळे शहराची वाढती लोकसंख्या पाहता नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अंबाजोगाई शहरासाठी १) रविवार पेठ २) देवीचे मंदिर ३) भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात, नवीन पोलीस चौक्या मंजूर करून कार्यान्वित करणे बाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी गृह मंत्री यांचेकडे दि.११/०१/२०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०२३) :** (१) होय

अंबाजोगाई, जि. बीड शहरात १) रविवार पेठ, २) देवीचे मंदिर, ३) भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात नवीन पोलीस चौक्या स्थापन करण्यासाठी नगर परिषद अंबाजोगाई यांना पोलीस स्टेशन अंबाजोगाई यांचे पत्र दि.०५/०६/२०२३ अन्वये जागा उपलब्ध करुन संमतीपत्र देण्याबाबत लेखी पत्र दिलेले आहे.

(२) सदरचे पत्र पोलीस महासंचालक यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पारनाका डहाणू (जि. पालघर) येथील गृह विभागाची पोलीस चौकी तोडल्याबाबत

**(२४) ५९६२२ (३०-०४-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) पारनाका येथील बेकादेशीरपणे गृह विभागाची पोलीस चौकी तोडणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी पालघर व पोलीस अधीक्षक पालघर ग्रामीण पोलीस यांना दिनांक ०६ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, डहाणू नगरपरिषदे कडून समुद्राकडे जाणाऱ्या राज्य महामार्ग लगत पारनाका येथे गृह विभागाची पोलीस चौकी सन १९३४ (ब्रिटीश काळापासून) च्या आधीपासून आहे तसेच त्या जागेचा सातबारा गट क्र. १५२/१/१/२ क्षेत्र ००.१५ आर असे असून सार्वजनिक शासकीय मालमत्ता चौकी असून जनतेच्या सुरक्षितेच्या दृष्टीने गरजेची आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पोलीस चौकी कुठल्याही प्रकारचा प्रस्थाव व आराखडा तयार न करता व तसेच त्या संबंधित अधिकाऱ्यांना आदेश न काढता तथा त्या संबंधित कार्यालयाला व अधिकाऱ्यांना कुठल्याही प्रकारची माहिती न देता सदरहू पोलीस चौकी तोडण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाह केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :** (१), (२), (३) व (४) होय.

सदर जागेचा गट क्र.१५२/१/१/२ क्षेत्र ००.०२.१५ आर असे असून उतारा प्राप्त आहे. सदरची पारानाका चौकी ही रस्त्याच्या कडेला असून, बाजूस समुद्र आहे. त्यामुळे समुद्रालगत पारनाका बीच असून, सदर बीचवर पर्यटनाच्या दृष्टीने पर्यटकांची ये-जा चालू असते. यास्तव जनतेच्या सुरक्षितेच्या दृष्टीने सदर ठिकाणी पोलीस चौकी गरजेची आहे. शासन परिपत्रक दि.०४/०४/२०१२, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन अन्वये डहाणु शहर विकास आराखडयात पारनाका चौक ते समुद्र किनाऱ्यावरील रस्ता हा १२.०० मीटर रूंदीकरणाचा प्रस्ताव प्रस्तावित असुन त्या रस्त्यामध्ये पारनाका पोलीस चौकी येत होती. सदर पोलीस चौकी ही निष्कासित करण्यापुर्वी पोलीस विभागाशी चौकी निष्काषित करणे संदर्भात चर्चा झालेली होती. पारनाका पोलीस चौकी ही दि.१४/८/२०२२ रोजी नगरपरिषद डहाणु यांचेकडुन तोडण्यात आली असुन, त्याबाबतचे पोलीस विभागास डहाणु नगरपरिषदेकडुन सदरचे पोलीस चौकीचे स्थलांतर त्या लगतच डहाणु

नगरपरिषदेने उपलब्ध करून दिलेल्या कॅबिनमध्ये लवकरात लवकर करण्याबाबत नगरपरिषदेने कळविले आहे. पारनाका पोलीस चौकीचे नविन बांधकामाचे जागेसाठी जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडील आदेशान्वये जुन्या जागेलगतच डहाणु पारनाका येथे स.नं. १६७ /१/१/९ क्षेत्र ०.०४.८१ पैकी ०.२.८१ या हे. आर. इतके क्षेत्र मंजुर होवुन सदरची जागा पारनाका पोलीस चौकीचे नावे झालेली आहे. सदर जागेची भुमी अभिलेख, डहाणु यांचेकडुन मोजणी होवुन तसा मोजणी नकाशा प्राप्त करण्यात आलेला आहे. सदर जागेवर पारनाका पोलीस चौकीचे बांधकाम डहाणु नगरपरिषद करणार असलेबाबत पत्र प्राप्त असुन , पारनाका पोलीस चौकीचे बांधकामाबाबतचा नविन आराखडा तयार करण्यात येत आहे. डहाणु नगरपरिषदेचे पत्राला अनुसरून उपरोक्त ठिकाणी नविन सुसज्य पारनाका पोलीस चौकीचे बांधकाम डहाणु नगरपरिषद यांचेकडुन करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साकेगाव (ता.भुसावळ, जि.जळगांव) या गावत बनावट नोटा सापडल्याबाबत**

**(२५) ५९७५२ (३०-०४-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साकेगाव (ता.भुसावळ, जि.जळगांव) या गावत १०० व २०० रुपये मूल्याच्या एकूण २० हजार रुपयांच्या बनावट नोटा सापडल्याची बाब दिनांक २० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच राजुरा (जि.चंद्रपूर) तालुक्यात ४० हजारात ५ लाख रुपयांच्या नकली नोटा विकण्याचा गुन्हयात दोन गुन्हेगारांना अटक झाल्याचे दिनांक १६ जानेवारी २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून जिल्हयात नकली नोटांचा चलनात आल्या असल्याची माहीती स्थानिक गुन्हे शाखेचा पथकास मिळाल्यानंतर नकली नोटासहीत १० लाख ७८ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०२३) :** (१) प्रश्नाधिन ठिकाणी १०० व ५० रूपयांच्या रू.२१,९००/- किमतीच्या बनावट चलनी नोटा सापडल्याची बाब दि.१९.०१.२०२३ रोजी निर्दशनास आली आहे, हे खरे आहे.
(२) होय.
(३) व (४)
अ) साकेगाव,ता.भुसावळ, जि.जळगांव येथील घटनेच्या अनुषंगाने भूसावळ तालूका पोलीस ठाणे, भूसावळ येथे गु.र.नं. ०७/२०२३ भा.द.वि. कलम ४८९(अ), (ब)(क)(ड), ३४ प्रमाणे दि.१९.०१.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात दोन आरोपींना अटक करण्यात आले असून आरोपींविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
ब) राजुरा, जि.चंद्रपूर येथील घटनेच्या अनुषंगाने राजूरा पोलीस ठाणे, चंद्रपूर येथे गु.र.नं. २०/२०२३ भा.द.वि. कलम ४२०, ३४ प्रमाणे दि.१५.०१.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील दोन आरोपीं अटक करण्यात आले असून त्यांना जामीन मंजूर झाला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.
(५) प्रश्न उभ्दवत नाही.

---

### नागपूर जिल्ह्यातील नरखेड व काटोल तालुक्यातील काही भागात भूगर्भात पाणी नसल्याबाबत

**(२६) ६०९३३ (२७-०४-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील नरखेड व काटोल तालुक्यातील काही गावे डार्क झोन मध्ये समाविष्ट करण्यात आले असून काही भागातील भूगर्भात पाणी नसल्यामुळे शेतकऱ्यांसमोर पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काटोल व नरखेड तालुक्यात संत्रा बागा मोठ्या प्रमाणात आहेत व संत्रा उत्पादनासाठी हे तालुके प्रसिद्ध असल्यामुळे या ठिकाणी मोठे धरण बांधावे, अशी मागणी गोंडेगाव गुंडबाबा धरण समितीने माहे डिसेंबर २०२२ मध्ये वा त्या दरम्यान जिल्हाधिकारी नागपूर यांना केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१९-१०-२०२३) :** (१) होय. नागपूर जिल्ह्यातील नरखेड व काटोल तालुक्यातील काही गावे अंशत: शोषित आहेत.

(२) होय. हे खरे आहे.

(३) याप्रकरणी कार्यकारी अभियंता, पाटबंधारे व जलविद्युत प्रकल्प अन्वेषन विभाग, नागपूर यांच्या अहवालानुसार गोंडेगांव कुंडबाब (नवेगांव रिठी) प्रकल्प वर्धा जी-८ मधील असून उर्ध्व वर्धा उपखोऱ्यामध्ये येत असल्याने सदर खोऱ्यात पाणी उपलब्ध नसल्यामुळे पुढील कार्यवाही करणे शक्य होणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजा-टाकळी,( ता. नागपूर ग्रामीण, जि. नागपूर) येथील देवस्थानच्या शेतजमीनीचा बेकायदेशीर करार करुन केलेला गैरव्यवहार

**(२७) ६१८८६ (३०-०४-२०२३). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा-टाकळी, (ता. नागपूर ग्रामीण, जि. नागपूर) येथील खसरा क्र. ४६, ५९, ६० ही शेतजमीन मारोती मंदिर देवस्थान, नोंदणी क्र. A-१२१६ (N) च्या मालकीची असल्याबाबत धर्मदाय सह आयुक्त नागपूर यांनी दिनांक २९ मार्च २०२२ रोजीच्या आदेशानुसार न्यायनिवाडा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मारोती देवस्थानच्या शेतजमीनीच्या सातबारा रेकॉर्डवर वहिवाटदार या नात्याने नोंद असलेल्या श्री. गौतम पुरी यांनी देवस्थानची शेतजमीन परस्पर श्री.अनिल पांडे व इतर यांच्याशी करार केला असून श्री.अनिल पांडे व इतर यांनी सदर शेतजमीनीवर अंजली वाटीका फार्मस या नावाने ले-आऊट टाकून प्लॉट ची विक्री करत असल्याबाबत संस्थेच्यावतीने पोलीस स्टेशन कुही, नागपूर ग्रामीण येथे दिनांक १४ जून, २०२२ रोजी तक्रार दिलेली असून सर्व कागदोपत्री पुरावे सादर केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संस्थेला न्याय मिळावा म्हणून लोकप्रतिनीधी यांनी मा. उपमुख्यमंत्री तथा गृह मंत्री यांना लेखी निवेदन दिले असता त्यांनी सुध्दा योग्य कार्यवाही करण्याबाबत सबंधीतांना आदेश दिलेले असून देखील पोलीस तपास अधिकारी यांनी शेतीच्या कराराबाबत आर्थिक व्यवहाराबाबत कोणत्याच प्रकारची चौकशी न करता सदर प्रकरण दिवाणी स्वरुपाचे असल्याबाबत देवस्थानच्या विश्वस्तांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, देवस्थानच्या शेतजमीनीच्या बेकायदेशीर व आर्थिक व्यवहाराबाबत कागदोपत्री व प्रत्यक्ष पुरावे असून सुध्दा तपास अधिकारी यांनी गैरअर्जदार श्री. गौतमपुरी व श्री. अनिल पांडे यांच्याशी संगनमत करुन सदर प्रकरण दिवाणी स्वरुपाचे असल्याबाबत वरिष्ठ अधिकारी यांना अहवाल दिला असून वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल केल्याचे निदर्शनात येत आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन  याप्रकरणी तपास अधिकारी व गैरअर्जदार यांच्या विरुध्द कोणती कारवाई केली, वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-१२-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) हे खरे नाही. सदर प्रकरणाची पोलीस विभागामार्फत चौकशी करण्यात आली असून जागेसंबंधी आर्थिक व्यवहार झाल्याचे चौकशी दरम्यान निदर्शनास आले नाही. प्रस्तुत प्रकरणाच्या एकूण चौकशीमध्ये सदर प्रकरण हे कौटुंबिक वारसदार यांचे आपआपसातील असल्याचे आढळून आल्यामुळे अर्जदार यांना दिवाणी न्यायालयात जाण्याचे लेखी सूचनापत्र पोलीस विभागाकडून दिनांक ३१.०१.२०२३ रोजी देण्यात आलेले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयात शेतकऱ्यांना विहीर मंजूर होऊनही वीज जोडणी मिळाली नसल्याबाबत

**(२८) ६२१३१ (३०-०४-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयात शेतकऱ्यांना विहीर मंजूर होवून विहीत कालावधीत विहिरी तयारही होऊन देखील वीज कनेक्शनसाठी महावितरण कार्यालयात डिमांडची रक्कम भरण्याबाबत शेतकऱ्यांना कृषी विभागाकडूनर मार्गदर्शन मिळाले नसल्यामुळे  विहिरींना वीज कनेक्शन मिळाले नसल्याची बाब माहे जानेवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली,  हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तयार झालेल्या विहीरींना विज कनेक्शन लवकारात लवकर मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) सन २०२२-२३ मध्ये उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत चंद्रपूर  जिल्हयासाठी ३२.१९ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.  सदर योजनेअंतर्गत ज्या  कृषीपंपाचे अंतर लघुदाब व उच्चदाब वाहिनीपासून २०० मीटर पेक्षा जास्त व ६०० मीटरच्या आत आहे, अशा कृषीपंप ग्राहकांना वीज जोडणी देण्यात येत आहे. तसेच अस्तित्वात असलेल्या लघुदाब व उच्चदाब वाहिनीपासून ६०० मीटरपेक्षा जास्त अंतर असलेल्या कृषीपंप ग्राहकांना महाऊर्जाव्दारे सौरपंप आस्थापित करुन देण्यात येत आहेत.  याव्यतिरिक्त, पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषी ग्राहकांना उपलब्ध निधी आणि जेष्ठता यादीनुसार वीज जोडणी देण्यात येत आहेत.

सन २०२३-२४ मध्ये मार्च २०२३ अखेर चंद्रपूर जिल्हयातील ६२७ कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या असून, उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील शासकीय वैद्यकिय महाविदयालय तथा जिल्हा सामान्य रुग्णालयातील शिकाऊ (इंटर्न) डॉक्टरांच्या सुरक्षतेबाबता

**(२९) ६२४२५ (३०-०४-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील शासकीय वैद्यकिय महाविदयालय तथा जिल्हा सामान्य रुग्णालयातील शिकाऊ (इंटर्न) डॉक्टराला मृत रुग्णाच्या एका नातेवाईकाने बेदम मारहाण केलाची घडना माहे जानेवारी, २०२३  मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली,  हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील प्रकरणामुळे येथील रुग्णालयातील शिकाऊ डॉक्टरांच्या सुरक्षतेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच शिकाऊ डॉक्टरांच्या सुरक्षतेबाबत कोणती उपाययोजना केली वा  करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
सदर प्रकरणी ड्युटीवर असलेले  शिकाऊ (इंटर्न) डॉक्टरास अश्लील शिवीगाळ करणे व मारण्यास अंगावर धावून जाणे अशी घटना घडली आहे. बेदम मारहाण झालेली नाही.
(२) नाही, घटनेदिवशी योग्य पोलीस बंदोबस्त लावण्यात आलेला होता तसेच रुग्णालयात येणारे जाणारे रुग्ण व सोबत असणारे त्यांचे नातेवाईक यांचेवर पोलीसांकडून बारकाईने नजर ठेवण्यात येत आहे.
(३) सदर प्रकरणामध्ये आरोपींना अटक करून त्यांचेवर भा.दं.वि. कलम ३५३, ३९४, ५०६, ३४ अन्वये चंद्रपूर पोलीस स्टेशन येथे गु. र. क्र. ८२/२०२३ गुन्हा दाखल केला आहे. तसेच, आरोपींविरुद्ध प्रतिबंधक कार्यवाहीसुद्धा करण्यात आली आहे. आरोपींविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
शासकिय वैद्यकीय महाविदयालय तथा जिल्हा सामान्य रुग्णालयातील शिकाऊ डॉक्टरांच्या सुरक्षेच्या दृष्टीने रुग्णालयात लावण्यात आले आहेत. रुग्णालयाच्या आवारात २४ तास  पोलीस चौकी कार्यरत असुन सदर ठिकाणी २ पोलीस उपनिरीक्षक, ४ पोलीस अंमलदार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलग्रस्ताना आळा घालण्याच्या दृष्टिने उपाययोजना करण्याबाबत

**(३०) ६२६२८ (२६-०४-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्ग नक्षलग्रस्त भागातील MH-१०१७२ धोडराज ते ईरपनार तालुका भामरागड या रस्त्याचे बांधकाम करताना दिनांक २१ जानेवारी, २०२१  रोजी वा त्यादरम्यान सशस्त्र नक्षलवाद्यांकडून रस्त्याच्या कामावर सुरू असलेल्या २१वाहनांची जाळपोळ केली, हे खरे आहे काय,
(२)  असल्यास, या घटनेच्या घटनास्थळाच्या पोलीस पंचनाम्यानुसार जवळपास २ कोटी रुपयांहून अधिक रकमेचे नुकसान झाल्याचे नोंदविण्यात आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास,  यापूर्वीही प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे काम करीत असताना तीन वेगवेगळ्या कामावर जाळपोळ करून ५ कोटी रुपयांचे नुकसान नक्षलवाद्यांनी केलेले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नक्षलग्रस्ताना आळा घालण्याच्या दृष्टिने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे तसेच जिल्ह्यातील कंत्राटदारांना नुकसानीची भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०२३) :** (१) बहुतांशी खरे असून  १९ वाहनांची जाळपोळ करण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अंशतः खरे आहे.
जाळपोळीच्या तीन वेगवेगळ्या घटना घडलेल्या आहेत. परंतु या तिन्ही घटनांमध्ये जाळपोळ करून केलेले नुकसान हे  ५ कोटी रुपयाचे नसून ६१,२०,०००/- रुपयाचे आहे.
(४) नक्षलवाद्याच्या हिंसक कारवायांना आळा घालण्यासाठी  गडचिरोली  जिल्हा पोलीस दलातर्फे गुप्तवार्ताच्या आधारे

लांब पल्याचे अभियान (एलआरपी), आखुड पल्ल्याचे अभियान (एसआरपी), नाकाबंदी अभियान तीव्र करण्यात आले आहे. शेजारील राज्यातील जिल्हा पोलीस यंत्रणेशी समन्वय ठेवुन आवश्यकतेनुसार आंतरराज्यीय संयुक्त नक्षलविरोधी अभियान राबविण्य येत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## राज्यातील लाचलुचपत प्रतिबंधक खात्यात कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या गैरवर्तणुकीबाबत

**(३१) ६४५६० (०१-०७-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील लाचलुचपत प्रतिबंधक खात्यात कार्यरत असलेल्या काही अधिकाऱ्यांच्या गैरवर्तणुकीमुळे लाचलुचपत प्रतिबंधक खात्याची प्रतिमा मलीन केल्याबाबत महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई यांचे कार्यालयाकडुन नमुद अधिकाऱ्यांना पोलिस दलात परत पाठविण्यासाठी पोलिस महासंचालक,महाराष्ट्र राज्य यांना अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी वरीष्ठ अधिकारी यांनी दखल घेऊन पोलिस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई, पोलिस मुख्यालय यांना अहवाल सादर करुनही अद्याप नमूद अधिकारी यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्रात कार्यरत असलेले लाचलुचपत प्रतिबंधक खात्याचे अधिकाऱ्यांचे गैरवर्तन व त्यांच्यावर झालेल्या तक्रारी पाहता तात्काळ त्यांना महाराष्ट्र पोलिस दलात परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२३) :** (१), (२) व (३)
I. लाचलुचपत प्रतिबंधक विभागामध्ये नेमणूकीस असलेल्या अधिका-यांनी राज्यात किंवा भारतात लागू असलेल्या नियम व कायदयांचे उल्लंघन किंवा गैरवर्तन केल्यास त्यांच्याविरुध्द संबंधित कायदयानुसार, पोलीस मॅन्युअल मधील तरतुदी किंवा महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९८१ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येते.
II. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या म्हणजेच पोलीस दलाच्या प्रतिमेला तडा पोहचविल्यास पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना त्याबाबत कसूरी अहवाल सादर करण्यात येतात. तसेच सदर अहवाल सादर केल्यानंतर संबंधित अधिका-यांबाबत महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या स्तरावर उचित कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यात सन २०२२-२३ मधील सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेच्या बचत निधीत झालेला गैरव्यवहार

**(३२) ६४७०१ (२७-०९-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यात सन २०२२-२३ मधील सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेच्या बचत निधीमधून पुनर्विनियोजन करतांना बचत निधीच्या दहापट कामे मंजूर केल्यामुळे झालेल्या अनियमिततेची चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ एप्रिल, २०२३ तसेच दिनांक ११ एप्रिल, २०२३ रोजी वा त्या सुमारास उपमुख्यमंत्री, अपर मुख्य सचिव नियोजन व विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडे तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अजित पवार (०७-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) शासनाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, नाशिक यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार, जिल्हाधिकारी, नाशिक यांनी त्यांच्या दि.०१/०७/२०२३ च्या पत्रान्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२२-२३ अंतर्गत ग्रामीण रस्ते विकास लेखाशिर्ष ३०५४२१०५ अंतर्गत पुर्नविनियोजनातून देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यता रद्द करण्यासाठी जिल्हा परिषद, नाशिक यांना मान्यता दिली आहे. त्यास अनुसरुन जिल्हा नियोजन समितीच्या दि. १४/०७/२०२३ रोजी झालेल्या बैठकीत सदर प्रशासकीय मान्यता रद्द करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रशासकीय मान्यता आदेश रद्द केल्याने लेखाशिर्ष ३०५४२१०५ अंतर्गत रुपये ४०.८८ कोटी रकमेच्या प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या असून रुपये ३५.९६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यामुळे अतिरिक्त कामे मंजूर केल्याचा मुद्दा उद्भवत नाही.

---

## धुळे शहरात चोरी, लुटमारीचे घटनांमध्ये वाढ होत असल्याबाबत

**(३३) ६४८५८ (२९-०८-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे येथील देवपूर जीटीपी स्टाफ परिसरात गजानन हाउसिंग सोसायटीतील प्लॉट नंबर १९, २२, २८ अशा तीन ठिकाणी एकाच रात्री चोरट्यांनी घरे फोडून चोरी केली असल्याचे दिनांक ४ जून २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धुळे येथे वारंवार घडणाऱ्या चोरी, व लुटमारीचा घटनांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०२३) :** (१) गजानन हाउसिंग सोसायटी, प्लॉट नं.२८,देवपूर, धुळे या ठिकाणी दि.०२ जून २०२३ रोजीच्या मध्यरात्री घरफोडी घडल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र प्लॉट नं.१९, २२ या ठिकाणी घरफोडी घडल्याचे निदर्शनास आले नाही.
(२) सदर घटनेच्या अनुषंगाने देवपुर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१५४/२०२३ भा.द.वि. कलम ४५७, ३८० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
अशा घटनांना आळा घालण्यासाठी बिट मार्शल, चार चाकी वाहने याव्दारे दैनंदिन रात्रगस्त व वेळोवेळी नाकाबंदी व कोम्बींग ऑपरेशन या उपाययोजना पोलीसांमार्फत राबविल्या जात आहेत.
(३) प्रश्न उभ्दवत नाही.

---

## चौंढे (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील घाटघर जलविदयुत प्रकल्प बंद असल्याबाबत

**(३४) ६५०१९ (२८-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चौंढे (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील आशिया खंडातील सर्वात मोठा घाटघर जलविदयुत प्रकल्प बंद अवस्थेत असल्याने वीज निर्मिती बंद असल्याचे दिनांक १६ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई परिसरात वीजेची मागणी उच्चपातळीवर असतांना वीजेची टंचाई दुर करण्यासाठी घाटघर जलविदयुत प्रकल्प सुरु करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-१०-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
घाटघर येथे १२५ मे.वॅ. क्षमतेचे दोन संच आहेत. घाटघर जलविद्युत केंद्र संच क्र. २ (१२५ मे.वॅ.) हा व्यवस्थितपणे कार्यरत असताना दिनांक ०८.०२.२०२३ रोजी जनित्रामध्ये (जनरेटर) तांत्रिक बिघाड झाल्यामुळे बंद झाला. सदर संचाच्या दुरुस्तीचे काम तातडीने पुर्ण करुन तो वीज निर्मितीकरीता दिनांक २६.०५.२०२३ पासून उपलब्ध झालेला आहे. सदर संच सध्या भार प्रेषण केंद्राच्या मागणीनुसार वीज निर्मिती व पंपिंग या दोन्ही पद्धतीने चालविला जात आहे.
घाटघर जलविद्युत केंद्र संच क्र. १ (१२५ मे.वॅ.) च्या जनत्रिामध्ये मोठा तांत्रिक बिघाड झाल्यामुळे दिनांक २०.०४.२०२२ पासून बंद आहे. सदर संच दुरुस्तीचे काम सुरु केले असता असे आढळून आले की, स्टेटर कोअर देखील दुरुस्त करावे लागेल. त्यामुळे सध्या सदर संचाच्या सर्व स्टेटर बारचे रिइन्सुलेशन व स्टेटर कोअर दुरुस्तीचे काम सुरु असून सदर संच वीज निर्मितीसाठी लवकरात लवकर उपलब्ध करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.
(२) घाटघर जलविद्युत केंद्र (२X१२५ मे.वॅ.) येथील दोन्ही संचांच्या जनित्रांमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याचे आढळल्यावर महानिर्मिती कंपनीने त्वरित संच क्र. २ चालू करण्यात यश मिळविले. तथापि संच क्र. १ चे दुरुस्तीचे काम सुरु असून सदर संच वीज निर्मितीसाठी लवकरात लवकर उपलब्ध करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.
(३) घाटघर जलविद्युत केंद्र (२X१२५ मे.वॅ.) येथील दोन्ही संच हे जनित्रामध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे बंद होते. संच क्र. १ चे दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. तर संच क्र. २ चे दुरुस्तीचे काम पुर्ण होऊन सदर संच दिनांक २६.०५.२०२३ पासून वीज निर्मितीकरीता उपलब्ध झालेला आहे व कमाल मागणीच्या काळात वीज निर्मिती होत आहे.
(४) प्रश्न उद्धवत नाही.

---

## मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची पुणे येथे स्थापना करण्याबाबत

**(३५) ६५०४१ (२८-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची पुणे येथे स्थापना करण्याची लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ४ जानेवारी, २०२३ तसेच दिनांक १९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे बार असोसिएशनने पुणे येथे मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापना करण्याची माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे,हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) च्या अनुषंगाने मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाची पुणे येथे स्थापना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-१२-२०२३) :** (१) व (२) होय.
(३) राज्यात उच्च न्यायालयाचे कायमस्वरुपी खंडपीठ स्थापन करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेसाठी पाठविण्यापूर्वी त्यास राज्य पुर्नरचना अधिनियम, १९५६ च्या कलम ५१ (२) नुसार उच्च न्यायालयाचे मा. मुख्य न्यायमूर्ती यांची सहमती आवश्यक आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या दि.१२/०५/२०१५ रोजीच्या बैठकीत कोल्हापूर येथे मा. उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ स्थापन करण्यास मान्यता देण्यात यावी तसेच पुणे येथेही मुंबई उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार करण्यात यावा, असी शिफारस मा. मुख्य न्यायमुर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याप्रमाणे शासनाने दि. १७/०७/२०१५ रोजीच्या पत्रान्वये शिफारस केली आहे. सदर शिफारशीचा सकारात्मक विचार करण्याची फेरविनंतीही दि. २८/०२/२०१८

रोजीच्या शासन पत्रान्वये मा. मुख्य न्यायमुर्ती यांना करण्यात आली आहे. सदर प्रकरणी त्वरित निर्णय होण्याकरिता शासन पत्र, दि.१९/०१/२०१९ अन्वये याबाबत बैठक आयोजित करण्याबाबत मा.मुख्य न्यायमुर्ती, मुंबई उच्च न्यायालय यांना विनंती करण्यात आली असून, शासन पत्र, विधि व न्याय विभाग, दि.१९/०३/२०२० अन्वये सदर विनंतीकडे उच्च न्यायालय प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत मोठया प्रमाणात वाढत असलेले सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण आणण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(३६) ६५१२० (२८-०८-२०२३). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.प्राजक्त तनपूरे (राहुरी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईकरांची सायबर ठगांकडून फसवणूक दिवसेंदिवस वाढत असून मुंबई पोलीसांकडे सायबर फसवणूकीच्या सुमारे ४ हजार २८६ गुन्ह्यांची नोंद झाली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्यावर्षीच्या तुलनेत या गुन्ह्यात तब्बल ४९ टक्क्यांनी वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीसांनी मोठया प्रमाणात क्रेडिट कार्ड आणि ऑनलाइन फसवणूक केल्याच्या १ हजार २२३ गुन्ह्यांची तर खरेदी, गिफ्ट, नोकरी, विमा, शैक्षणिक प्रवेश, गुंतवणूक, क्रिप्टो करन्सी, कर्ज आणि अन्य फसवणूकींच्या १ हजार ९६१ गुन्ह्यांची नोंद केली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त फसवणूकीच्या ४ हजार २८६ गुन्ह्यांपैकी पोलीसांना फक्त २७९ गुन्ह्यांची उकल करण्यात यश आल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मुंबईकरांची सायबर ठगांपासून मुक्तता करण्यासाठी तसेच वाढत असलेल्या सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०२३) :** (१) व (२) नाही,
मुंबईत माहे सन मे,२०२३ अखेर पर्यंत सायबर गुन्ह्यांची फसवणूकीचे एकूण १९०९ गुन्हे नोंद आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेने या गुन्ह्यांमधे
३.८८% घट झालेली आहे.
(३) व (४) अंशत: खरे आहे,
मुंबई शहरात माहे मे,२०२३ रोजी पर्यंत क्रेडिट कार्ड आणि ऑनलाईन फसवणूक बाबत ५४१ गुन्हे नोंद आहेत.खरेदी, गिफ्ट, नोकरी, विमा, शैक्षणिक प्रवेश,गुंतवणूक क्रिप्टो करन्सी कर्ज आणि अन्य फसवणूकीचे ९९८ गुन्हे नोंद आहेत.

मुंबई शहरात माहे ऑगस्ट,२०२३ रोजी पर्यंत २८८९ सायबर गुन्हे नोंद असुन त्यापैकी ४१६ गुन्हे उघडकीस येवून त्यामध्ये ५९१ आरोपी अटक करण्यात आले आहेत.
(५) सायबर गुन्हे संदर्भातील सर्व प्रकारच्या तक्रारी हातळण्यासाठी National Cyber Crime Reporting Portal सुरू करण्यात आले आहे व नागरिकांना येणा-या शंकाचे समाधान करण्यासाठी टोल फ्री हेल्प लाईन क्र.१९३० सुरु करण्यात आला आहे.संभाव्य सायबर गुन्हे टाळण्यासाठी जनजागरुकता शिबिरे घेतली जातात. तसेच सोशल मिडियाद्वारे, इंटरनेट माध्यमांद्वारे देखील सर्व सामान्य नागरिकांना सायबर गुन्ह्याच्या अनुषंगाने सावध राहण्याचे आवाहन केले जाते. सायबर गुन्हयांना आळा घालण्यासाठी मार्गदर्शिका (अॅडवायझरी) प्रसारित करून सायबर गुन्ह्यांबाबत माहिती दिली जाते.

---

## यवतमाळ तालुका उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालयातील उप अधीक्षक यांना लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्याबाबत

**(३७) ६५३१६ (०३-०९-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ तालुक्यातील (जि. यवतमाळ) तालुका उप अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालयातील उप अधीक्षक श्री. विजय लालसिंग राठोड याना त्यांच्या कार्यालयात १० हजार रुपयांची रोख लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दि. २६ एप्रिल २०२३ रोजी वा त्यासुमारास रंगेहाथ पडकून अटक केली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी श्री. विजय लालसिंग राठोड यांच्या घराची, कार्यालये , बँक , लॉकर यांची झडती व तपासणी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशी काय आढळुन आले त्याअनुषंगाने संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) आरोपी लोकसेवक, तत्कालीन उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, यवतमाळ यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत सापळा कारवाई केल्यानंतर त्यांच्या राहत्या घराची व कार्यालयाची झडती घेण्यात आली असून सदर झडतीमध्ये आक्षेपार्ह असे काहीही आढ़ळून आलेले नाही.
(३) I. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती यांच्याकडून करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक तत्कालीन उप अधीक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, यवतमाळ (वर्ग-२) यांना त्यांच्या कार्यालयात रु.१०,०००/- इतक्या रकमेची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यानंतर आलोसे यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ प्रमाणे अवधूतवाडी पोलीस ठाणे, यवतमाळ येथे दिनांक २६/०४/२०२३ रोजी गुन्हा नोंद क्रमांक ६३९/२०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्यात आलोसे यांना त्याच दिवशी अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती यांच्यामार्फत सुरू आहे.
II. सदर प्रकरणी, आरोपी लोकसेवक श्री.लालसिंग राठोड यांना जमाबंदी आयुक्त आणि संचालक भुमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दिनांक ०३.०५.२०२३ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व (अपील) नियम, १९७९ चे नियम ४(२) (अ) मधील तरतुदीनुसार अटक केल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक २६.०४.२०२३ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आलेले असून त्यांच्याविरुद्ध विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड शहर व ग्रामीण भागात घरफोडीचे सत्र सुरुच असल्याबाबत**

**(३८) ६५३२६ (२८-०८-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहर व ग्रामीण भागात घरफोडीचे सत्र सुरुच आहे त्यातच नांदेड ग्रामीण व कुटूंर ठाण्याच्या हद्दीत दोन घरफोडया करुन चोरटयांनी एक लाखाचा ऐवज पळविला असल्याचे माहे मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, वरसणी (जि. नांदेड) येथील हनुमान मंदिर परिसरात ७ मे, २०२३ रोजी गेट व दाराचे कुलूप तोडून घरातील लोखंडी कपाटातील १५ हजार रुपयांसह पाऊण लाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरटयांनी चोरुन नेले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त घरफोडया प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०२३) :** (१) व (२) होय.

प्रश्नाधिन दोन्ही घरफोडीच्या घटनेत नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत वसरणी (जि.नांदेड) येथे रूपये ७० हजार व कुटुंर पोलीस स्टेशन हद्दीत अंतरगाव येथे रूपये २० हजार असा एकूण रूपये ९० हजाराचा ऐवज चोरीला गेल्याचे दिसून येते.

(३) अ) वसरणी (जि.नांदेड) येथील घटनेच्या अनुषंगाने नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.३२५/२०२३ भा.द.वि. कलम ४५७, ३८० प्रमाणे दि.०९/०५/२०२३ रोजी अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास सूरू आहे.

ब) अंतरगाव येथील घटनेच्या अनुषंगाने कुंटुर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.८१/२०२३ भा.द.वि. कलम ४५७, ३८०, ३४ प्रमाणे दि.०९/०५/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्यात ३ आरोपी निषन्न झाले आहेत. सदर आरोपींना सी.आर.पी.सी. कलम १०७ प्रमाणे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सूरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पी.एम जी पी कॉलनी, पुनमनगर, अंधेरी (पूर्व ) या म्हाडा वसाहतीमध्ये**
**इमारत क्रमाक १ ते १७ इमारतीचा पुनर्विकासाबाबत**

**(३९) ६५३७६ (१०-१०-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पी.एम जी पी कॉलनी, पुनमनगर, अंधेरी (पूर्व ) या म्हाडा वसाहतीमध्ये इमारत क्रमाक १ ते १७ इमारतीचा मे.श्रीपती रिअल व्हॅचर्स, एल एल पी यांचेमार्फत संस्थेचा पुनर्विकासाचा प्रस्ताव दिनांक १४/११/२०१३ रोजी म्हाडास सादर करण्यात येऊन संस्था, विकासक व म्हाडा यांच्यामध्ये म्हाडा हिश्याकरिता दि.२७/०८/२०१५ रोजी त्रिपक्षिय करारनामा करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विकासकास १७ इमारतीचा एकत्रित पुनर्विकास करण्याकरिता म्हाडाकडून दिनांक १३ नोव्हेंबर, २०१४ , दिनांक ०८ जुलै, २०१६ व दिनांक ०५ जानेवारी, २०१८ रोजी असे तीन वेळा देकारपत्रे देण्यात येऊनही अदयाप इमारतीचा पुनर्विकास झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्था आणि त्यांचे विकासक मे.श्रीपती रियल व्हॅचर्स एल एल पी यांना चौथी व अखेरची संधी देऊन सहकार विभागाच्या दिनांक ०४ जुलै, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार पुनर्विकास प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या २० टक्के इतकी बॅक गॅरटी ३०दिवसाच्या आत देण्याच्या अधीन राहून, सदरहू १७ इमारतीचा पुनर्विकास करण्यासाठी डीसीपीआर -२०३४ मधील वि नि नि ३३ (५) मधील अट क्र २ मधील तरतुदीनुसार ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक शासन पत्र दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० अन्वये मंजूर करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, दिनांक ४ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयानुसार २० टक्के बँक गॅरटी देउण्यास विकासक तयार नसल्याने म्हाडाने प्रचलित नियमातील तरतुदीनुसार मे. श्रीपती रियल व्हेंचर्स एल एल पी या विकासकाची नेमणूक रदद करुन सदरचा प्रकल्पाचा पुनर्विकास म्हाडाने स्वतः करावा किंवा म्हाडामार्फत अन्य विकासकाची नेमणूक करुन पुनर्विकास प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी म्हाडास शासनाने दिला आहे हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने दिलेल्या सूचनेनुसार गेल्या १२ वर्षापासून १७ इमारतीचा रखडलेला पुंनर्विकास म्हाडाच्या स्तरावर करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे (०१-११-२०२३) :**(१), (२), (३) व (४) होय.
(५) सदर प्रकल्प म्हाडाकडून राबविण्यासाठी प्रकल्पाची व्यवहार्यता तपासण्यासाकरिता मे. एलोरा प्रोजेक्ट कंन्सल्टंट यांची म्हाडाच्या स्तरावर नेमणूक करण्यात आली. त्यांच्या अहवालानुसार उक्त प्रकल्प म्हाडाच्या स्तरावर राबविणे वर्धनक्षम नसल्याचे दिसून आले. तद्नंतर सदरहू प्रकल्प म्हाडामार्फत कंन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट एजन्सी (Construction and Development Agency) ची नेमणूक करण्याच्या पर्यायाचा म्हाडाने विचार केलेला आहे, त्यानुसार, या प्रकल्पासाठी कंन्स्ट्रक्शन अँड डेव्हलपमेंट एजन्सीची नेमणूक करण्यासाठी निविदा प्रक्रियेबाबतची कार्यवाही म्हाडाच्या स्तरावर सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्हयात निराधार योजनेचे पैसे मिळवून देतो यासाठी बाराशे रुपये खर्च येतो असे म्हणून वृध्द महिलेची फसवणूक केल्याबाबत

**(४०) ६५४०३ (२८-०८-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयात निराधार योजनेचे पैसे मिळवून देतो यासाठी बाराशे रुपये खर्च येतो असे म्हणून वृध्द महिलेच्या गळयातील १५ हजार रुपये किंमतीचे मंगळसूत्र घेवून फसवणूक करण्यात आली असल्याची घटना दिनांक १० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात बिलोली पोलीस ठाण्यात चोरटया विरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गुन्हयाचा तपास करुन आरोपीला अटक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :**(१) व (२) होय.
(३) प्रश्नाधिन घटनेच्या अनुषंगाने बिलोली पोलीस स्टेशन येथे गू.र.नं.७६/२०२३ भा.द.वि. कलम ४२० प्रमाणे दि.१०/०५/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास पोलीसांकडून सुरू आहे.
(४) प्रश्न उभ्दवत नाही.

---

**मौजे काठी (ता. इंदापूर,जि. पुणे) येथे हुंड्याची मागणी करुन युवकाला मलमूत्र खायला लावल्याबाबत**

**(४१) ६५५०८ (२८-०८-२०२३). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे काठी (ता. इंदापूर,जि. पुणे) येथे २१ वर्षीय युवकाला लग्न आणि हुंड्याचा वाद विकोपाला जाऊन मारहाण तसेच मलमूत्र खाण्यास लावण्याचा घृणास्पद प्रकार घडल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी दहा जणांविरोधात महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष अघोरी प्रथा आणि जादूटोणा प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०२३) :** (१) सदर घटना दिनांक ११.०४.२०२३ रोजी घडली
(२) सदर प्रकरणी आरोपींविरुध्द इंदापूर पोलीस स्थानकात गु.र.नं. ४४०/२०२३ भादवि कलम १४३, १४७, १४९, ३७७, ३२४, ५०४, ५०६, २९५अ, सह महाराष्ट्र नरबळी इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध उच्चाटन अधिनियम २०१३ चे कलम ३, माहिती तंत्रज्ञान (सुधारित) अधिनियम, २००८ चे कलम ६७ अ अन्वये दिनांक १९ एप्रिल, २०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) सदर गुन्ह्यातील ३ आरोपींना अटक करण्यात आलेली असून इतर आरोपींचा शोध सुरू आहे.गुन्ह्यातील अटक आरोपींविरुद्ध तसेच इतर आरोपींविरुद्ध सी. आर. पी. सी. २९९ प्रमाणे मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नरवडे (ता.कणकवली, जि.सिंधुदूर्ग) धरण प्रकल्पाचे काम बंद असल्याबाबत**

**(४२) ६५५२० (०३-०९-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नरवडे (ता.कणकवली, जि.सिंधुदूर्ग) धरण प्रकल्पाचे काम दिनांक ०३ मार्च, २०२३ रोजी वा त्यासुमारास नरवडे प्रकल्पग्रस्त ग्रामस्थांनी बंद पाडले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करण्यात याव्यात त्यानंतरच कामाला सुरुवात करा अशी मागणी ग्रामस्थांनी त्यावेळी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे व त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने काय निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

दिनांक ०५ मार्च, २०२३ रोजी नरवडे प्रकल्पग्रस्तांनी प्रकल्पाचे काम बंद पाडले आहे.

(२) होय,हे ही खरे आहे.

(३) प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या मुख्यत: भूसंपादन व पुनर्वसन संबंधीत आहेत. याबाबत महसूल व वन विभाग तसेच जलसंपदा विभागामार्फत नियमोचित कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मु. पो. तुळींज (वसई) पोलीस ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षकाला श्री. रामचंद्र शेंडगे यांनी एक लाख रुपयांची लाच घेतल्याबाबत**

**(४३) ६५५३० (२७-०९-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु. पो. तुळींज (वसई) पोलीस ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षक श्री.रामचंद्र शेंडगे यांना एक लाख रुपयांची लाच घेताना ठाण्याच्या लाचलुचपत विभागाने अटक केल्याचे दिनांक १७ मे २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री. रामचंद्र शेंडगे यांच्या घर तसेच बँक लॉकरचा तपास करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून त्याअनुषंगाने संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२३) :** (१) सदर प्रकरणी आरोपी लोकसेवक पोलीस उपनिरीक्षक, तुळींज पोलीस स्टेशन, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांनी तक्रारदार यांच्याविरुध्द दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये जामीन मिळण्यास व गुन्हयात मदत करणेकरीता तक्रारदार यांच्याकडे आरोपी लोकसेवक यांनी स्वतःकरिता रु.५०,०००/- व वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्याकरीता ५०,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान पडताळणीअंती निष्पन्न झाले आहे. त्यानुसार दिनांक १७/०५/२०२३ रोजी आलोसे यांच्याविरुद्ध तुळींज पोलीस ठाणे गु.र.नं.३८०/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८ ) चे कलम ७ व ७(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांना दिनांक १७/०५/२०२३ रोजी अटक करण्यात आली असून दिनांक १५/०६/२०२३ रोजी आरोपी लोकसेवकास जामीन मंजुर झालेला आहे. सदर गुन्हयाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांच्यामार्फत सुरू आहे.

(२) सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने, आरोपी लोकसेवक पोलीस उपनिरीक्षक, तुळींज पोलीस स्टेशन, मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय (वर्ग-२ अराजपत्रित) यांच्या घरझडती दरम्यान आक्षेपार्ह अशी कोणतीही मालमत्ता आढ़ळून आलेली नाही.

(३) सदर प्रकरणी, आरोपी लोकसेवक यांना पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर वसई विरार यांच्या दिनांक २५.०५.२०२३ रोजीच्या आदेशान्वये अटक केल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक १७.०५.२०२३ पासून निलंबित करण्यात आलेले असून त्यांची प्राथमिक चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुदखेड व किनवट (जि.नांदेड) तालुक्यात अवैध हातभट्टीची दारु उत्पादन व वाहतुक होत असल्याबाबत**

**(४४) ६५५४२ (३०-०८-२०२३). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर),**

**प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुदखेड व किनवट (जि.नांदेड) तालुक्यात मोठया प्रमाणात अवैध हातभट्टीच्या दारुचे उत्पादन व चोरटी वाहतूक होत असल्याचे माहे मे,२०२३ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील हातभट्टीच्या दारुचे उत्पादन व चोरटी वाहतूक रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०२३) :** (१) व (२) मुदखेड (जि.नांदेड) तालुक्यात अवैध हातभट्टीच्या दारु संबंधी बाबी माहे मे, २०२३ मध्ये निदर्शनास आल्या असून त्यात ७ गुन्हे दाखल झाली आहेत. सदर गुन्ह्यात ७ आरोपींना अटक करण्यात आली असून रू.१,१२,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच सर्व प्रभारी अधिकारी यांना अवैध हातभट्टीच्या दारूचे उत्पादन व चोरटी वाहतूक होणार नाही याबाबतच्या सूचना पोलीस अधीक्षक, नांदेड यांचेकडून देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धापेवाडा (ता.सावनेर, जि.नागपूर) येथे एका व्यक्तीला अबकारी अधिकाऱ्यांनी मारहाण केल्याबाबत

**(४५) ६५५७८ (२७-०९-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धापेवाडा (ता.सावनेर,जि.नागपूर) येथे पाच अबकारी अधिकाऱ्यांनी दारुच्या नशेत एका व्यक्तीला मारहाण केली असल्याचे दिनांक १ मे,२०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी सावनेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली असतानाही दोषींवर अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी मारहाण झालेल्या व्यक्तीने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केलेली नाही, तसेच

तथापि, ज्या आबकारीचे अधिकारी व कर्मचारी यांनी मारहाण केली आहे त्यांची बदली झाली असल्याने त्यांच्या विरुद्ध कोणतीही कारवाई करावयाची नाही असे तक्रारदाराने अर्जाच्या चौकशी दरम्यान पोलीसांच्या बयानात सांगितले असल्याने सदर प्रकरणी पोलीसांकडून पुढील कारवाई करण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथे एका दाम्पत्याने शहरातील अनेक नागरीकांची कोटयावधीं रुपयांची फसवणूक केल्याबाबत**

**(४६) ६५५९२ (२७-०९-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील खासगी बँकेत अधिकारी असल्याची बतावणी करुन एका दाम्पत्याने शहरातील अनेक नागरीकांची कोटयावधीं रुपयांची फसवणूक केली असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी गणेश पेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :**(१) होय. नागपूर शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत पोलीस ठाणे गणेश पेठ येथे एच. डी. एफ. सी. बॅंकेत मॅनेजर असल्याचे भासवून व अधिक पैसे परत देण्याचे आमिष दाखवून ऑनलाईन व कॅश अशी एकूण रु. १९,६७,००० एवढ्या रक्कमची फसवणूक केली असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) यासंदर्भात पोलीस ठाणे गणेश पेठ येथे दोन आरोपींविरुद्ध दिनांक ०३.०५.२०२३ रोजी भा.दं.वि. कलम ४०९, ४२०, ३४ अन्वये गु.र.क्र. १८३/२०२३ गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीसांमार्फत गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुरबाड तालुक्यातील (जि.ठाणे) लघुपाटबंधारे योजनांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४७) ६५८२८ (१२-०९-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील विधानसभा मतदार संघातील शासनाच्या जलसंधारण विभागामार्फत ९ लघु पाटबंधारे योजनांना मंजूरी देवून सुमारे सहा वर्षाचा कालावधी होऊनसुद्धा अद्याप सदरच्या लघु पाटबंधारे योजनांना निधी उपलब्ध करुन दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे , हे खरे आहे काय ,

(२) तसेच प्रकल्पाची प्रगती व आणि निधीची मागणीनुसार ४ लघु पाटबंधारे योजनांसाठी निधी देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित ५ योजनांची वनजमीन संपादन कार्यवाही सद्या प्रगतीत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उर्वरित ५ लघु पाटबंधारे योजनांची वन जमीन संपादन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (१७-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) होय. हे खरे आहे.

मुरबाड तालुक्यातील ०४ लघु पाटबंधारे योजनांना मागणीनुसार निधी प्राप्त झालेला आहे.

(४) मुरबाड तालुक्यातील ०२ लघु पाटबंधारे योजनांना महामंडळाकडून स्थगिती आहे. उर्वरित ०३ कामांचे वनजमीन संपादन करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोलीस मुख्यालय चाळ क्र. १ ते ९ इमारतीचे दुरुस्तीचे काम करण्याबाबत**

**(४८) ६५८६८ (२८-०८-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस मुख्यालय चाळ क्र. १ ते ९ इमारतीचे दुरुस्तीचे काम करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (वडाळा) यांनी सह पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई यांना दिनांक ६ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास देण्यात आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने इमारत दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-११-२०२३) :** (१) व (२) होय.

पोलीस वसाहतींची दुरुस्ती व देखभाल सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत केली जाते. यास्तव, सदर निवेदन कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई ( सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई यांस पुढील कार्यवाही करिता पाठविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

**पुणे शहरातील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील रहिवाशांच्या प्रश्नाबाबत**

**(४९) ६५९१८ (०३-०९-२०२३). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील दांडेकर पूल व गुजरात कॉलनी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांतील रहिवाशांचे विविध प्रश्न मार्गी लावण्याबाबत पालकमंत्री यांनी प्रशासनाला माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान काही मार्गदर्शक सूचना केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गदर्शक सुचनांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांतील रहिवाशांचे प्रश्न तातडीने सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०६-११-२०२३) : (**१) दिनांक २४.०४.२०२३ रोजी मा. पालकमंत्री, पुणे यांनी खालील तीन झोपडपट्टी पुनर्वसन योजनांबाबत बैठक आयोजित केली होती. १) स. नं. १३५, फा. प्लॉट क्र. २८, दांडेकर पुल, झोपडपट्टी. २) श्री. पुण्येश्वर सह. गृह. संस्था मर्या. सि.स.नं. १२६५ ते १२७८, कसबा पेठ येथील झोपडपट्टी. ३) गुजरात कॉलनी कोथरुड येथील झोपडपट्टी.

(२) मा. पालकमंत्री, पुणे यांनी १. दांडेकर पूल येथील सध्यस्थिती जाणून घेतली व त्याबाबत प्रगतीच्या विकासक मे. नाईकनवरे डेव्हलपर्स यांना योजनेत प्रगती करावी अशा सूचना दिल्या. २. श्री. पुण्येश्वर सह. गृह. संस्था, कसबा पेठ बाबतच्या झोपडपट्टी संदर्भात शासन स्तरावर अल्पसंख्याक विभाग यांचेबाबत बैठक घ्यावी, असे निर्देश दिले. ३. गुजरात कॉलनी येथील झोपडपट्टी संदर्भात प्राधिकरणाच्या नियमानुसार composite इमारतींबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

(३) स. नं. १३५, फा. प्लॉट क्र. २८, दांडेकर पुल या जागेवर पीएमएल चे आरक्षण, पुलाचे नियोजन, नाला सरळीकरण या बाबी पार पडल्या असून तेथील योजनांना गती देण्यात येत आहे. श्री. पुण्येश्वर सह. गृह. संस्था, कसबा पेठ बाबतच्या झोपडपट्टीच्या अनुषंगाने अल्पसंख्याक विभागासोबत बैठक आयोजित करण्याबाबत अल्पसंख्याक विभागास झोपुप्रा, पुणे मार्फत विनंती करण्यात आली आहे. गुजरात कॉलनी कोथरुड येथील झोपडपट्टी संदर्भात प्राधिकरणामार्फत दिनांक ०५.०६.२०२३ रोजी पर्यावरण विभागाकडील व इतर विभागाकडील आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता विकासक यांनी सादर केलेल्या नकाशानुसार ५७.५५ मी. उंचीच्या इमारतीच्या प्रस्तावित बांधकामाकरिता रेखांकन परवानगीस मान्यता देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खडकवासला ( जि. पुणे ) धरणाच्या पाण्याचा जवळच कच्च्या गावठी दारुची भट्टी सुरु असल्याबाबत**

**(५०) ६५९५४ (२७-०९-२०२३). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खडकवासला (जि. पुणे) धरणाच्या पाण्याचा अगदी जवळच कच्च्या गावठी दारूने भरलेले तब्बल चाळीसपेक्षा जास्त प्रत्येकी दोनशे लिटरचे बॅरल दिनांक १३ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या याठिकाणी अनेक वर्षापासून राजरोसपणे गावठी दारुची भटटी सुरु असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक पोलिसांना माहिति असतांनाही जाणीपूर्वक कारवाई करण्यास दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे, हेही खरे आहे काय ,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२३) :**(१) दि. ३०.०३.२०२३ रोजी मौजे ओसाडे, ता. वेल्हा, जि. पुणे येथील हॉटेल मूनवॉकच्या मागील खडकवासला धरणाच्या बॅक वॉटर येथे २०० लिटर मापाचे अंदाजे ६०० लिटर रसायन असलेले निळया रंगाचे एकूण २५ बॅरल मिळून आले आहेत. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले रसायन पुढील तपासाकरिता न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आलेले असून त्यांच्याकडून अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) पोलीस विभागास प्राप्त गोपनीय माहितीच्या आधारे मौजे ओसाडे, ता. वेल्हा, जि.पुणे या ठिकाणी स्थानिक ग्रामस्थांसमक्ष दि. ३१.०३.२०२३ रोजी पोलीसांनी छापा टाकून भा.द.वि. कलम ३२८, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५ (ख) (ड) प्रमाणे वेल्हा पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र. २९/२०२३ दाखल केला आहे. सदर प्रकरणी अटक केलेल्या एका आरोपीस मा. न्यायालयाने जामिनावर मुक्त केले आहे. महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ९३ अन्वये सदर आरोपीवर पोलीसांकडून प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.